www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १४ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार १७ मे २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात

### वळवाच्या पावसाने तुटलेल्या झाडांच्या फांद्या ठाण्यात तशाच पडून, ठाणेकरांमध्ये संताप !



● ठाणे, रोहित जैसवाल :

अवकाळी वादळी पावसामुळे ठाणे शहरात ठिक ठिकाणी वृक्ष उन्मळून पडले, झाडांच्या फांद्या मोडून पडल्या . पण या फाद्यांना ठाणे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी उचलून त्यांची विल्हेवाट लावली नाही. त्यामुळे शहराचा महत्वाचा व कायम वर्दळीच्या नौपाडा परिसरात या फांद्या पडून असल्यामुळे ठाणेकरांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. तश्या तक्रारीही महापालिका आयुक्तांकडे ऑनलाईन करण्यात आल्या,असे ज्येष्ठ नागरिक महेंद्र मोने यांनी स्पष्ट केले. पान २ वर

## ऑलिवंट, आर्थर, एस पुलांच्या पुनर्बांधणीची गरज नाही, रेल्वे प्रशासनाचे मुंबई महानगरपालिकेला पत्र




● मुंबई, नितीन देवळेकर :

माझगाव येथील ऑलिवंट पूल, आर्थर पूल, भायखळा येथील एस पूल या तीन पुलांच्या पुनर्बांधणीची सध्या गरज नसल्याचे रेल्वे प्रशासनाने मुंबई महानगरपालिकेला कळवले आहे. रेल्वेमार्फत १० ते १५ वर्षांनंतर या पुलांच्या पुनर्बांधणीबाबतचे पुनरावलोकन करण्यात येईल. त्यामुळे तूर्तास या पुलांचे कोणतेही काम हाती घेण्यात येणार नाही, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे. मुंबई शहर भागातील पुलांच्या कामांचा आढावा घेण्यासाठी मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडमधील (महारेल) अधिकाऱ्यांची बुधवार, १५ मे रोजी संयुक्त बैठक पार पडली. मुंबई शहरात सुरू असलेली पुलांची कामे वेगाने, तसेच नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी या बैठकीत दिले.

पान २ वर

# शिवाजी पार्कवर पीएम मोदींची 'राज'सभा, शिवतिर्थावर महायुती करणार शक्तीप्रदर्शन

● मुंबई, यश सावंत :



गुढीपाडवा मेळाव्यात राज ठाकरेंनी लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदींसाठी महायुतीला बिनशर्त पाठिंबा देण्याची घोषणा केली. त्यानंतर आता शुक्रवारी म्हणजे 15 मे रोजी राज ठाकरे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी एकाच मंचावर येणार आहेत. निमित्त आहे शिवाजी पार्कवर होणाऱ्या महायुतीच्या प्रचाराच्या सांगता सभेचं. महाराष्ट्रात पाचव्या आणि अंतिम टप्प्यात राज्यातील 13 मतदारसंघात येत्या 20 मे रोजी मतदान होणार आहे. यासाठीच्या प्रचाराची सांगता शनिवारी होईल. याआधी पूर्वसंध्येला मुंबईतल्या शिवाजी पार्कवर पंतप्रधान मोदींची सभा होणार आहे. या सभेत राज ठाकरेंचंही भाषण या सभेत होणाराय. त्यामुळे या सभेबाबतची उत्सूकता शिगेला पोहोचलीय.

राज ठाकरेंनी आतापर्यंत महायुतीच्या उमेदवारांसाठी तीन प्रचारसभा घेतल्या. कणकवलीत नारायण राणेंसाठी, पुण्यात मुरलीधर मोहोळांसाठी तर कळव्यात श्रीकांत शिंदे आणि नरेश म्हस्केंसाठी राज ठाकरेंनी प्रचार केला. आता शिवाजी पार्कवरची त्यांची ही चौथी सभा असणाराय. अलिकडेच एका मुलाखतीत पंतप्रधान मोदींनी राज ठाकरेंचं कौतुक केलं होतं.

राज ठाकरे आमच्यासाठी नवीन नाहीत. त्यांनी यापूर्वी आम्हाला पाठिंबा दिलाय. महाराष्ट्राच्या विकासातही ते हातभार लावू शकतील असे आम्हाला वाटते. त्यांचं सोबत येणं केवळ सत्तेसाठी किंवा राजकीय गणितांसाठी नाही. लोकसेवेसाठी एकत्र येणे, हा त्यामागचा उद्देश आहे, असं मोदी म्हणाले होते.

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मनसेनं एकही उमेदवार उभा केलेला नाही. मात्र मुंबई-ठाणे-नाशिकमध्ये मनसेची चांगली ताकद आहे. त्यामुळं शिवाजी पार्कच्या सभेत पंतप्रधान मोदींच्या भाषणाइतकीच राज ठाकरे काय बोलणार, याचीही उत्सूकता आहे.

मुंबईतल्या महायुतीच्या सहा उमेदवारांसाठी पीएम मोदी आणि राज ठाकरेंची सभा होणार आहे. मुंबईत महायुतीनं 6 पैकी 4 जागांवर मराठी, तर 2 जागांवर अमराठी उमेदवार दिलेत. उत्तर मुंबईतून केंद्रीय मंत्री पियूष गोयल आणि उत्तर पूर्व मुंबईतून मिहीर कोटेचा असे भाजपचे 2 उमेदवार अमराठी आहेत. उत्तर मध्य मुंबईतून भाजपनं ॲड. उज्ज्वल निकम यांना मैदानात उतरवलंय. शिवसेना शिंदे गटानं दक्षिण मुंबईतून यामिनी जाधव, दक्षिण मध्य मुंबईतून विद्यमान खासदार राहुल शेवाळे आणि उत्तर पश्चिम मुंबईतून रवींद्र वायकर या मराठी उमेदवारांना तिकीट दिलीत.

## राज्यभरात वाहन परवान्याचे काम ठप्प; 'सारथी' संकेतस्थळ 'इतक्या' दिवस राहणार बंद



● पुणे, अभिजित येरल्लू :

परिवहन विभागाचे (आरटीओ) 'सारथी' संकेतस्थळ पुन्हा एकदा बंद पडले आहे. गुरुवारी दुपारी एकच्या सुमारास अचानक संकेतस्थळ देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी १६ ते १८ मे पर्यंत बंद राहणार असल्याचा संदेश संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यामुळे राज्यभरातील प्रादेशिक परिवहन विभातील शिकाऊ आणि पक्का परवान्याचे काम ठप्प झाले आहे.

नागरिकांच्या सोयीच्या दृष्टिकोनातून परिवहन विभागाने जास्तीत जास्त सेवा ऑनलाइन करण्यावर भर दिला आहे. त्यात अलीकडे आरटीओच्या काही सेवांबाबत आरटीओमध्ये न येता (फेसलेस) कामे करण्यावर भर दिला जात आहे. पण गेल्या काही दिवसांपासून संकेतस्थळाला येणाऱ्या तांत्रिक अडचणीमुळे नागरिक त्रस्त आहेत. गुरुवारी पून्हा एकदा दुपारी एकच्या सुमारास 'सारथी' संकेतस्थळ अचानक बंद पडले.

पान २ वर

## व्यापारी मार्ग उभारणीनंतर कृषिमाल पुरविण्यात महाराष्ट्राची भूमिका महत्वपूर्ण, परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांचे प्रतिपादन

● नाशिक, सचिन कदम :



मध्यपूर्व अशियातील काही देश अन्नधान्यासाठी इतरांवर अवलंबून आहेत. भारताने मध्य पूर्व अशिया-युरोप तसेच भारत -इस्रायल, अमेरिका-संयुक्त अरब अमिरात हे व्यापारी मार्ग उभारणीवर लक्ष केंद्रीत केले आहे. या क्षेत्रातील अन्नधान्यावर परावलंबी असणाऱ्या राष्ट्रांना नियमित कृषिमाल, अन्नधान्य पुरविण्यात महाराष्ट्र महत्वाची भूमिका बजावू शकतो, असे प्रतिपादन परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांनी केले.श्वास फाऊंडेशनच्यावतीने गुरुवारी येथील गुरुदक्षिणा सभागृहात जयशंकर यांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. विजय चौथाईवाले आणि कॅम्लिनचे श्रीराम दांडेकर यांनी त्यांची मुलाखत घेतली. फाऊंडेशनचे प्रमुख प्रदीप पेशकार यांनी प्रास्ताविक केले. जयशंकर यांनी बिघडलेले भारत-कॅनडा संबंध, पाकव्याप्त काश्मीर, चीनलगतच्या सीमावर्ती भागात पायाभूत सुविधांचा विकास आदींवर भाष्य करताना काँग्रेस आणि मोदी सरकारच्या कार्यकाळातील परराष्ट्र धोरणातील फरक मांडला. समुद्राच्या पलीकडील राष्ट्रांशी संबंध चांगले असल्याचे चित्र काँग्रेसकडून रंगविले जात असे. आता भारताने थेट युरोपपर्यंत आर्थिक व्यापारी मार्गासाठी सर्व राष्ट्रांची सहमती मिळवली आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. उभय क्षेत्रात अन्नधान्य वितरण हा मोठा व्यवसाय आहे. फूड पार्कमध्ये गुंतवणूक, मूल्यवर्धनातून त्यांची अन्नधान्याची गरज महाराष्ट्राला पूर्ण करता येईल, असा दावा त्यांनी केला.

पान २ वर

## प्रतिबंधात्मक नोटीसांच्या मुद्द्यावरून जितेंद्र आव्हाड यांचा ठाणे पोलिसांना इशारा



● ठाणे, विशाल कारंडे :

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून नोटीस बजावण्यात आली असून त्यांना १५ ते १९ मे या कालावधीत विभागातून बाहेर राहण्याचे आदेश पोलिसांनी दिले आहे. या नोटीसानंतर राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) नेते जितेंद्र आव्हाड यांनी या नोटीसांना विरोध केला आहे. पोलिसांनी आवरते घ्यावे अन्यथा ज्या क्षेत्रामध्ये पदाधिकाऱ्यांना नोटीसा बजावल्या जात आहे. ते क्षेत्र बंद करु असा इशारा आव्हाड यांनी दिला आहे.

निवडणूकीमध्ये मतदारांवर प्रभाव पाडला जाऊ शकतो असे सांगत ठाणे पोलिसांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून नोटीस बजावली आहे. या मुद्द्यावरून जितेंद्र आव्हाड यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेत पोलिसांवर आरोप केले. पदाधिकाऱ्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी नसतानाही पोलिसांकडून नोटीस पाठविली जात आहे. पोलिसांची वागणूक चुकीची आहे. पोलिसांनी राजकीय गुलाम बनू नये. पान २ वर

# कोल्हापूर, इचलकरंजी महापालिकेचे सांडपाणी प्रक्रियेविना पंचगंगेत

### प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालातील माहिती

● कोल्हापूर, विशाल पाटील :



प्रदूषणामुळे पंचगंगा नदी गटारगंगा बनली असताना त्यास कोल्हापूर व इचलकरंजी महापालिका कारणीभूत असल्याची धक्कादायक माहिती प्रदूषण नियंत्रण मंडळाने गुरुवारी पाठवलेल्या नोटीसमधून उघडकीस आली आहे. कोल्हापूर महापालिकेचे ४२.५ दशलक्ष लीटर तर इचलकरंजी महापालिकेचे १८ दशलक्ष लीटर सांडपाणी प्रक्रियेविना थेट पंचगंगेत मिसळत असल्याचा निष्कर्ष संयुक्त पाहणी अहवालात नमूद केला आहे.

अलीकडे पंचगंगा नदीच्या प्रदूषणामध्ये पुन्हा मोठी भर पडली आहे. नदीमध्ये काळेशार, फेसाळलेले, दुर्गंधीयुक्त पाणी वाहत असून मासे मारण्याचे प्रमाण वाढले आहे. नदी प्रदूषण प्रकरणी उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेले प्रजासत्ताक सामाजिक संघटनेचे अध्यक्ष दिलीप देसाई यांनी प्रदूषण मंडळाकडे तक्रार केली होती.

पान २ वर

# मनी हाइस्टपासून प्रेरणा घेत अंमली पदार्थांची तस्करी; पोलिसांनी असं उघड केलं रॅकेट

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



छत्तीसगड पोलिसांनी रायपूरमधून अंमली पदार्थांची तस्करी करणारे एक रॅकेट नुकतेच उध्वस्त केले. पोलिसांपासून वाचण्यासाठी आणि अवैध धंदे उघड होऊ नयेत म्हणून तस्करांनी मनी हाइस्ट वेबसीरीजमधील पात्रांची सांकेतिक नावे धारण केल्याचे या प्रकरणातून समोर आले आहे. अंमली पदार्थांची तस्करीत मुख्य सहभाग असलेल्या आयुष अग्रवाल नावाच्या २७ वर्षीय आरोपीने स्वतःला 'प्रोफेसर' असे सांकेतिक नाव दिले होते. नेटफ्लिक्सवरील मनी हाइस्य या मालिकेत 'प्रोफेसर' हे मुख्य पात्र होते.

छत्तीसगडच्या गुन्हे प्रतिबंधक आणि सायबर युनिटने स्थानिक पोलिसांसह केलेल्या संयुक्त कारवाईत ही रॅकेट उघडकीस आणले. रायपूरमधील धोत्रे मंगल कार्यालयाच्या एका खोलीतून आरोपींना पकडण्यात आले. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे हा छापा टाकण्यात आला. ज्यामध्ये चार आरोपींना जेरबंद करण्यात आले. ज्यामध्ये एक महिला आणि एक आंतरराज्य पेडलर होता. हे सर्व आरोपी कोकेन आणि एमडीएमए या अंमली पदार्थांची तस्करी करत होते.

पान २ वर

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखडे २० मे पर्यंत सादर करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश



● रत्नागिरी, दिगंबर जाधव :

पाटबंधारे विभागाने नदीपात्रातील गाळ काढण्यास प्राधान्य द्यावे. जुन्या इमारती, पूल, शाळा यांचे संबंधित विभागांनी स्ट्रक्चरल ऑडीट करावे. सर्वच विभागांनी आपत्ती व्यवस्थापन आराखडे २० मे पर्यंत पाठवावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात मान्सूनपूर्व तयारीसाठी गुरूवारी आढावा बैठक घेण्यात आली.

बैठकीला पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी, अपर जिल्हाधिकारी शंकर बर्गे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव आदी उपस्थित होते.निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी यांनी संगणकीय सादरीकरण करुन गेल्या वर्षी झालेला सरासरी पाऊस, २०११ ते २०२३ या कालावधित झालेला सरासरी पाऊस, आपत्तींचा पूर्वानुभव, पूर प्रवण, दरड प्रवण गावे, रासायनिक कारखाने, धोकादायक कारखाने आदींबाबत सविस्तर माहिती दिली.

■ महावितरणने जीर्ण पोल बदलावे, धोकादायक झाडांच्या फांद्या तोडणे जलद कृती पथक तयार करणे आदी कामे करावीत. लोटे एम आय डी सी असोसिएशमची बैठक घेऊन सतर्क करावे. शिक्षण विभागाने धोकादायक शाळा, छत दुरुस्ती आदी बाबतची कामे करावीत, असेही जिल्हाधिकारी म्हणाले.

■ पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांनी स्थानिक प्रशासनाने आपल्या स्तरावर बैठक घेवून सुक्ष्म नियोजन करावे. पडलेली झाडे हटवण्यासाठी कटर सारखी साधन सामुग्री व्यवस्थित ठेवावी, अशा सुचना केल्या. या बैठकीला विविध विभागांचे प्रमुख, प्रांताधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आदी उपस्थित होते.

पान २ वर

# महापालिका आक्रमक; होर्डिंग वाचविण्यासाठी जाहिरातदारांची पळापळ

● नवी मुंबई, भावना जैन :



मुंबईमधील होर्डिंग दुर्घटनेनंतर नवी मुंबई महानगरपालिकाही आक्रमक झाली आहे. शहरातील अनधिकृत होर्डिंगविरोधात मोहीम सुरू केली आहे. बुधवारी एका दिवसामध्ये १५ होर्डिंग हटविले असून गुरुवारी पहाटे पाच वाजेपर्यंत ही मोहीम सुरू होती.

घाटकोपर येथे १३ मे रोजी झालेल्या होर्डिंग दुर्घटनेनंतर महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी १४ मे रोजी दूरदृष्य प्रणालीद्वारे तत्काळ महानगरपालिका अधिकारी यांची बैठक घेतली. शहरातील होर्डिंगचे सर्वेक्षण करून स्ट्रक्चरल ऑडिट तत्काळ सादर करण्याचे आदेश ठेकेदारांना दिले होते. तेन करणाऱ्यांवर तत्काळ कारवाई करावी, ज्यांनी परवान्यांचे नूतनीकरण केले नाही त्यांच्यावरही कारवाईचे आदेश दिले होते. सर्व विभाग अधिकाऱ्यांना तत्काळ सर्वेक्षण करण्याच्या सूचना केल्या आहेत. १५ मे ला सायंकाळी ५ वाजल्यापासून अनधिकृत होर्डिंगविरोधात कारवाई सुरु केली. गुरुवारी पहाटे पाचपर्यंत १२ तासामध्ये १५ होर्डिंग हटविण्यात आले. अतिक्रमण विभागाचे उपायुक्त राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई सुरू केली आहे.

पान २ वर

## संपादकीय

# 'शोर्मा' ठरतोय जीवघेणा !

गेल्या काही वर्षांत जंक फूड किंवा फास्ट फूड यांविषयीची आवड लोकांमध्ये प्रचंड प्रमाणात वाढत चालली आहे. यामध्ये तरुण वर्गाचे प्रमाण लक्षणीय आहे. शाळकरी मुलांमध्येही हल्ली जंक फूडची विशेष क्रेज दिसून येते. लोकांची वाढती आवड लक्षात घेऊन शहरासारख्या ठिकाणी प्रमुख मार्गांसह, बाजारपेठा, रेल्वे -बस स्थानके, शाळा महाविद्यालये यांसारख्या ठिकाणी जंक फूडचे स्टॉल्स मोठ्या प्रमाणात उभारले जाऊ लागले आहेत. या जंकफूडपैकीच एक असलेला 'शोर्मा' नावाचा मांसाहारी पदार्थ आजमितीला अनेकांच्या आवडीची डिश बनला आहे. अनेकजण तो घरी बनवण्याचाही प्रयत्न करताना दिसतात; मात्र रस्त्याच्या कडेला मिळणाऱ्या या पदार्थाची चव घरी बनवल्या जाणाऱ्या शोर्माला येत नाही असे मत खाद्य पदार्थाचे शौकीन व्यक्त करतात. तरुणांच्या जिभेचे चोचले पुरवणारा हाच शोर्मा आज अनेकांचे आरोग्य बिघडवणारा आणि काहींचे तर प्राण घेणारा ठरू लागला आहे. त्यामुळे कोणी जर हा रस्त्यालगतचा शोर्मा खात असेल तर त्यांनी सावध व्हायला हवे. मांसापासून बनवलेले पदार्थ उघड्यावर विकणे बेकायदेशीर असतानाही आज या नियमांची ठिकठिकाणी सर्रास पायमल्ली होताना दिसत आहे.

२०२२ मध्ये केरळच्या कासारगोड येथे शोर्मा खाल्यामुळे ५८ जणांना विषबाधा झाली होती. त्यापैकी एका लहान मुलीचा दुर्दैवी अंत झाला होता. या शोर्माचे नमुने तपासले असता त्यामध्ये बुरशी तयार झाल्याचे लक्षात आले. या बुरशीमुळेच खाणाऱ्यांना विषबाधा झाली होती. ही घटना घडल्यानंतर तामिळनाडूचे आरोग्यमंत्री मा सुब्रमनियन यांनी लोकांना शोर्मा न खाण्याचे आवाहन केले होते; मात्र लोकांनी त्याकडे दुर्लक्ष केले, आज देशभरात हा शोर्मा शहरांसोबत ग्रामीण भागांतही विकला जाऊ लागला आहे. शोर्मा हे मध्यपूर्व भागातील लोकप्रिय स्ट्रीट फूड आहे. या पदार्थाचा शोध तुर्कीमध्ये लागल्याचे मानले जाते.ओटोमन साम्राज्यादरम्यान अरब प्रदेशातील लेव्हंट प्रदेशात पहिल्यांदा शोर्मा तयार केल्याचेही मानले जाते, पारंपारिकरित्या हा पदार्थ कोकराच्या मांसापासून तयार करण्यात येत होता. कालांतराने चिकन, टर्की, गोमांस किंवा वासराचे मांस वापरण्यात येऊ लागले. भारतात विकला जाणारा शोर्मा चिकन पासून बनवला जातो असे मानले जात असले तरी यामध्ये कोणते मास वापरले जाते याबाबत कुठेही खात्री केली जात नाही. काही दिवसांपूर्वी चिकन मोमोजमध्ये कुत्र्याचे मांस वापरण्यात आल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यामुळे रस्त्यालगत मिळणाऱ्या शोर्मासाठी वापरण्यात येणाऱ्या मांसामध्येही अशा प्रकारची भेसळ केली जात असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२०२३ मध्ये केरळातील एका तरुणाचा शोर्मा खाल्यामुळे विषबाधा होऊन मृत्यू झाला होता. मानखुर्दमध्ये हल्लीच प्रथमेश घोक्षे नावाच्या तरुणाचा रस्त्यावरील शोर्मा खाल्यामुळे विषबाधा होऊन मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आनंद कांबळे आणि महंमद अहमद रेजा शेख यांना अटक करून गुन्हा नोंदवला. काही दिवसांपूर्वी गोरेगाव येथेही शोर्मातून १२ जणांना विषबाधा झाली . मांसापासून बनवल्या जाणाऱ्या शोर्मा आणि मोमोजची रस्त्यालगत सर्रासपणे अवैध विक्री केली जात आहे. असे पदार्थ आरोग्याला हानीकारक असूनही स्थानिक प्रशासनाकडून त्यांवर कारवाई होत नाही. याविषयी हिंदु जनजागृती समितीच्या सुराज्य अभियानाकडून आरोग्यमंत्री, तसेच अन्न आणि औषध प्रशासनमंत्री यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. अशा प्रकारे उघड्यावर खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी कारवाई करावी आणि त्याचा अहवाल आरोग्य विभागाला पाठवावा. यामध्ये दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी सुराज्य अभियानाचे समन्वयक श्री. अभिषेक मुरुकटे यांनी तक्रारीमध्ये केली आहे. २४ तासानंतर शोर्मा या पदार्थामध्ये मानवी प्रकृतीला हानीकारक द्रव्ये निर्माण होतात. त्यातील मांस कधीपर्यंत टिकाऊ आहे, याची कालमर्यादा देण्यात येत नाही. कालबाह्य मांस खाल्ल्यामुळे त्यातून विषबाधा होण्याची शक्यता असते. शोर्मा खातांना त्यावर 'मेयॉनीझ' हा पांढऱ्या रंगाचा 'सॉस' वापरला जातो. अंड्यातील बलक वापरला जातो. तो योग्यरित्या साठवला जातो का, याविषयी शाश्वती नसते. मोमोजमध्ये वापरण्यात येणारे 'आजोडिकार्बोनामाईड' आणि 'बेंझॉईल पॅरॉक्साईड' हे शरिरासाठी हानीकारक आहे. यातून मधुमेहासारखे विकार बळावत आहेत. यासारख्या मुद्यांचा या तक्रारीमध्ये ठळकपणे उल्लेख करण्यात आला आहे. अशा प्रकारे उघड्यावर होणाऱ्या मांसाहारी खाद्यपदार्थांमुळे सामाजिक स्वास्थ्य वेठीस धरले जात आहे. त्यामुळे कुणाच्या तक्रारीची वाट न पहाता प्रशासनाने यांवर स्वत:हून कारवाई करावी, अशी मागणी श्री. मुरुकटे यांनी सुराज्य अभियानाद्वारे केली आहे. रस्त्यावरील स्टॉल्सवर खाद्यपदार्थ विकताना बऱ्याचदा स्वच्छता राखली जात नाही. मांसापासून बनवण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांच्या बाबतीत जी काळजी घेतली पाहिजे, मांस साठवण्यासाठी जी उपकरणे असायला हवीत ती रस्त्यावरील स्टॉल्सवर असतातच असे नव्हे. अशा ठिकाणी अधिक काळ मांस बाहेर राहिल्यामुळे त्यातून विषबाधा होण्याची शक्यता बळावते. २०२२ मध्ये केरळमध्ये शोर्मा खाल्यामुळे विषबाधा झाल्याची घटना घडल्यानंतर तामिळनाडूच्या आरोग्यमंत्र्यांनी खाद्यपदार्थ विकणाऱ्या राज्यभरातील स्टॉल्सची तपासणी करण्याचे आदेश दिले होते. ज्या स्टॉल्सवर अन्नपदार्थ ठेवण्यासाठी आणि साठवण्यासाठी आवश्यक सुविधा नसतील अशा १००० स्टॉल्स आणि दुकानांवर यावेळी दंडात्मक कारवाई करण्यात आली होती. आपल्याकडे अशा प्रकारची कारवाई केव्हा होणार ? शाळकरी मुले आणि तरुणांमध्ये दैनंदिन खाण्यात 'जंक फूड'चे वाढते प्रमाण खरेतर चिंतेचा विषय आहे.



## आजची चित्रोळी

असें फळावें आयुष्य सारे
दु:खाला मग वावच नाहीं !
सार्थ होईल जन्माचे या

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर,**
**विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### वळवाच्या पावसाने तुटलेल्या झाडांच्या फांद्या ...

शहरांत रस्तावर झाडांच्या फांद्यांचे ढीगच्या ढीग पडलेले आहेत. वर्दळीच्या रस्त्यांवर ते वाहतुकीस अडथळा ठरत आहेतच पण करदात्या नागरिकांना चालणे मुश्किल झाले आहे. काही ठिकाणी तर ह्या फांद्या पदपथावर पसरून ठेवलेल्या दिसत आहेत. या झाडांच्या फांद्या व अवशेष राम मारुती रोड, गोखले रोड तसेच विष्णूनगर परिसरातील अरुंद गल्लीबोळातील रस्त्यांवर दिसून येते आहेत.

चार दिवसांनी मतदान आहे, हे जाणून असून नागरिकांनी जास्तीत जास्त मतदान करावे म्हणून जनजागृतीहि करीत आहात. या ढिगार्यामुळे नागरिकांमध्ये चिडचिड निर्माण होऊन शहराचा हैपीनेस इंडेक्स घसरत आहे ह्याची गांभीर्याने नोंद घ्यावी0, असे ही आयुक्तांकडे केलेल्या तक्रारीत स्पष्ट करण्यात आले आहे.

### ऑलिवंट, ऑर्थर, एस पुलांच्या पुनर्बांधणीची...

मुंबई महानगरपालिका आणि महारेल यांच्यात रेल्वेवरील पूल बांधणी कामात समन्वय असावा, जेणेकरून नागरिकांना अधिक चांगली सेवा देणे शक्य होईल. तसेच पुलांच्या पुनर्बांधणी कामांदरम्यान मुंबईकर नागरिकांना कोणत्याही समस्या भेडसावू नयेत, असे निर्देश मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले होते. त्यानुसार ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

मुंबई शहर भागातील जीर्ण पुलांची दुरूस्ती आणि वाहतुकीच्या कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी महानगरपालिका आणि महारेलने संयुक्तपणे रेल्वेवरील पुलांची कामे हाती घेतली आहेत. मुंबई महानगरपालिका मुख्यालयात अभिजीत बांगर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीला महानगरपालिकेचे प्रमुख अभियंता (पूल) विवेक कल्याणकर, उप प्रमुख अभियंता (शहर) राजेश मुळे, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक (व्यवसाय विकास आणि वित्त) सुभाष कवडे, महारेलचे व्यवस्थापक (नियोजन) जितेंद्र कुमार, अतिरिक्त मुख्य प्रकल्प व्यवस्थापक असीतकुमार राऊत, अतिरिक्त मुख्य व्यवस्थापक श्रीरामगिरी श्रीकांत आदी उपस्थित होते.

मुंबईत रेल्वे मार्गांवर असलेल्या पुलांच्या पुनर्बांधणीचा खर्च महानगरपालिकेमार्फत करण्यात येतो. प्रत्यक्ष पूल उभारणी प्रकल्पाची कामे ही महारेलमार्फत करण्यात येत आहेत. मुंबई शहर भागातील रे रोड, भायखळा, टिळक पूल (दादर) आणि घाटकोपर येथील पुलांच्या कामांचा आढावा बैठकीत घेण्यात आला.

### राज्यभरात वाहन परवान्याचे काम ठप्प; 'सारथी' ...

शनिवार (दि. १८) पर्यंत संकेतस्थळ देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी बंद राहणार असल्याचा संदेश संकेतस्थळावर देण्यात आला आहे. अचानक संकेतस्थळ बंद पडल्यामुळे राज्यभरातील आरटीओत गुरुवारी वाहन परवाना काढण्यासाठी, नुतनीकरणासाठी आलेलेल्या नागरिकांचा खोळंबा झाला. परवान्याचे काम न झाल्यामुळे अनेक जणांना रिकाम्या हातानी परतावे लागले. शिकाऊ वाहन परवान्यासाठी १६ ते १८ दरम्यानच्या काळात ज्या नागरिकांनी परवान्यासाठी अपॉइंटमेंट घेतलेली, त्यांनी नव्याने अपॉइंटमेंट घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

मागील एक वर्षापासून आरटीओचे कधी 'सारथी' तर कधी 'वाहन' संकेतस्थळ बंद पडते. सुरु झाले तरी आठ ते दहा दिवसांनंतर पून्हा दिवसातून एक ते दोन वेळा सर्व्हर डाऊन होते. त्यामुळे ऑनलाइन अर्ज केल्यानंतर पेमेंट न होणे, नवीन शिकाऊ, पक्का वाहन परवाना काढणे, कर्जाचा बोजा चढविणे-उतरविणे, परवाना नूतनीकरण, डुप्लिकेट परवाना आदी कामे ठप्प होतात. संकेतस्थळ कधी सुरू होणार, तांत्रिक अडचणी कधी दूर होणार याची माहिती नसल्यामुळे नागरिकांना विनाकारण आरटीओच्या फेऱ्या माराव्या लागतात. यामध्ये वेळ आणि पैसा वाया जातो.

नॅशनल इन्फर्मेशन सेंटर (एनआयसी) मार्फत 'सारथी' संकेतस्थळाचा कारभार चालवला जातो. गुरुवारी दुपारी एकच्या सुमारास संकेतस्थळ बंद पडले. १६ ते १८ दरम्यान देखभाल दुरुस्तीसाठी संकेतस्थळ बंद राहणार असल्याचा संदेश प्रसिद्ध करण्यात आला. संकेत स्थळ देखभाल दुरुस्तीसाठी तीन दिवस बंद राहणार असल्याची आरटीओला देखील माहिती दिली नसल्याने आरटीओ आणि एनआयसी यांच्यात समन्वय नसल्याचे दिसून येते. परिवहन विभागाचे उपायुक्त (संगणक) संदेश चव्हाण यांच्याशी संपर्क साधला असता. त्यांनी संकेत स्थळावर माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. याबद्दल काहीच कल्पना नसल्याचे सांगितले.

### व्यापारी मार्ग उभारणीनंतर कृषिमाल पुरविण्यात ...

चीनने पाकव्याप्त काश्मीरमध्ये विविध प्रकल्पांत मोठी गुंतवणूक केली आहे. मात्र पीओकेची कायदेशीर स्थिती त्यांनाही ज्ञात आहे. पाकिस्तान-चीन दरम्यानच्या करारात तसा उल्लेख आहे. जागेच्या कब्जात बदल होतील, तेव्हा चीनलाही ते मान्य करावे लागतील. कायम भारतविरोधी धोरणे राबविणाऱ्या पाकिस्तानची धोरणे, विचारात आता तरी बदल होतात का, यावर भारताचे लक्ष असल्याचे त्यांनी सूचित केले.

सागरी व्यापारी मार्गावरील चाचेगिरी रोखण्यासाठी भारतीय नौदलाने २२ युध्दनौका तैनात करून सर्व राष्ट्रांच्या जहाजांना सुरक्षा कवच पुरवले. भारतीय अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेत भारताला स्थायी सदस्यत्व देण्यासाठी मतदान झाल्यास बहुतांश राष्ट्रांचे पाठबळ मिळेल, असा विश्वास जयशंकर यांनी व्यक्त केला. देशातील महागाई नियंत्रणात आहे. दहा वर्षातील धोरणांमुळे आर्थिक स्थिरता आल्याचे त्यांनी सांगितले.

भारतीयांचा जगभरातील प्रवेश सोपा करण्यासाठी पुढील काळात डिजिटल पारपत्र उपलब्ध करण्यात येणार आहे. जेणेकरून प्रत्येकाची ओळख चीपमध्ये सुरक्षित राहील. पश्चिमी देशांकडून भारतीयांना व्हिसा देण्यास वेळ लागतो. त्यांची व्हिसा देण्याची कार्यक्षमता वाढविणे आपल्या हाती नाही. त्यामुळे भारताने संबंधितांनी ही व्यवस्था 'इ व्हिसा'वर परावर्तीत करण्याचा आग्रह धरल्याचे जयशंकर यांनी सांगितले.

### प्रतिबंधात्मक नोटीसांच्या मुद्द्यावरून जितेंद्र आव्हाड...

संविधानाने नागरिकांना कोणत्याही भागात राहण्याचे अधिकार दिले आहेत. पोलिसांनी आवरते घ्यायला हवे अन्यथा आम्ही वेगळे पावले उचलू. ज्या क्षेत्रामध्ये असे प्रकार घडत आहेत. ते क्षेत्र बंद करु असा इशारा आव्हाड यांनी दिला आहे.

ठाण्यात मोक्काचे आरोपी पॅरोलवर बाहेर आहेत. हत्या सारखे गंभीर गुन्ह्यातील आरोपी सत्ताधारी पक्षाशी संबंधित असून ते मोकाट फिरत आहेत. त्यांची नावे माझ्याकडे आहेत. ते नागरिकांना दमदाटी करत आहेत. परंतु त्यांच्यावर कारवाई होत नाही. त्यांच्या नावाने नोटीसा काढाव्या असेही आव्हाड म्हणाले. ही निवडणूक लोकशाही वाचविण्यासाठी होत आहे. परंतु लोकशाहीची हत्या सुरू आहे. या प्रकाराविषयी निवडणूक आयोगाला तक्रार करण्यात येईल. मतदान प्रचाराच्या दिवसांत पदाधिकाऱ्यांना प्रचार करण्यापासून दूर केले जात आहे, हा अन्याय आम्ही सहन करणार नाही असेही आव्हाड म्हणाले.

### कोल्हापूर, इचलकरंजी महापालिकेचे सांडपाणी...

त्याआधारे प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर व इचलकरंजी महापालिका, करवीर व इचलकरंजी प्रांताधिकारी यांच्या प्रतिनिधींनी कोल्हापूर, इचलकरंजी व शिरोळ तालुक्यामध्ये पंचगंगा नदीची पाहणी करून प्रदूषणाचे नमुने घेऊन पाहणी अहवाल तयार केला होता.

कोल्हापूर महापालिकेचे एकूण १४९ दशलक्ष लिटर प्रतिदिन सांडपाणी तयार होते. त्यातील १०६ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया होते. उर्वरित ४२.५ दशलक्ष लीटर सांडपाणी विना प्रक्रियांमध्ये सोडले जाते. इचलकरंजी महापालिकेत ३८ दशलक्ष लीटर सांडपाणी होते. त्यातील २० दशलक्ष लीटर पाण्यावर प्रक्रिया होते. उर्वरित पाणी पंचगंगेत सोडले जाते असे अहवालात नमूद केले आहे.

त्याआधारे आज प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी ज. शं. साळुंखे यांनी दोन्ही महापालिका तसेच उचगाव, पाचगाव, गांधीनगर, वळीवडे, गडमुडशिंगी व कळंबा या ग्रामपंचायतींना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. सात दिवसांत उचित कार्यवाही करावी अन्यथा जल प्रदूषण नियंत्रण कायद्यानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

### मनी हाइस्टपासून प्रेरणा घेत अंमली पदार्थाची ...

रस्त्यावर अंमली पदार्थाची विक्री होत असल्याच्या वृत्तानंतर सदर छापा टाकण्यात आला होता. या टोळीचा पर्दाफाश करण्यासाठी पोलिसांनी एक योजना आखली होती. पथकातील एका व्यक्तीने संभाव्य ग्राहक असल्याचा बनाव करत तस्करांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला. या माध्यमातून तस्करांची महत्त्वाची माहिती गोळा केली गेली.

सुरुवातीला कुसुम हिंदुजा (वय २३) आणि चिराग शर्मा (वय २५) या दोन आरोपींना अटक केली गेली. या आरोपींना अंमली पदार्थ विक्री करताना रंगेहात पकडण्यात आले. दोघांची चौकशी केल्यानंतर मनी हाइस्टबाबतची माहिती समोर आली. या मालिकेतील पात्रांपासून प्रेरीत होऊन आरोपींनी स्वतःची सांकेतिक नावे ठेवली होती. पोलिसांना गुंगारा देण्यासाठी ही शक्कल लढविल्याचे त्यांनी सांगितले.

दिल्लीतील रहिवासी असलेल्या महेश सिंह खडगा (वय २९) याने दिल्लीहून प्रतिबंधित असलेले अंमली पदार्थ छत्तीसगडमध्ये आणून ते आयुष अग्रवालला पुरविले. आरोपी आयुष अग्रवालने कुसुम हिंदुजा आणि चिराग शर्मा यांच्या माध्यमातून ते ग्राहकांपर्यंत पोहोचवले.

या छाप्यात पोलिसांनी १७ लहान पिशव्यातून २१०० मिलिग्रॅम एमडीएमए आणि ६६०० मिलिग्रॅम कोकेन जप्त केले. यासह एक डिजिटल इलेक्ट्रॉनिक वजनाचे मशीन, आठ मोबाइल फोन, ८६ हजारांची रोकड, तीन सोन्याच्या साखळया, एक लॅपटॉप, एक आयपॅड, तीन एटीएम कार्ड, एक सीम कार्ड आणि एक ऑडी कार जप्त केली. अंमली पदार्थ कायद्याच्या कलम २१ आणि २२ अन्वये आरोपीविरुद्ध कारवाई होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखडे २० पर्यंत सादर ...

जिल्हाधिकारी सिंह यांनी विभागनिहाय सविस्तर पूर्व तयारीचा आढावा घेतला. ते म्हणाले, सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली सुरु असल्याबाबत गटविकास अधिकारी नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांनी तपासून खात्री करावी. प्रत्येक तहसीलदारांकडे सॅटेलाईट फोनचे वितरण करा. कृषी विभागाने तातडीने पंचनामे करण्याची तयारी ठेवावी. तालुकास्तरीय यंत्रणेने आपल्याकडील असणारी साधनसामुग्री सुस्थितीत आहे का याची तपासून खात्री करावी. पाटबंधारे विभागाने नद्यांमधील विशेषत: शहरालगतच्या भागातील गाळ काढण्याचे काम अधिक सक्रीय आणि प्राधान्याने करावे. धोकादायक ठिकाणी इशारे देणारे फलक उभारावेत. नियंत्रण कक्षाची स्थापना करून, जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्कात रहावे. आय एम डी कडून पावसाचा इशारा मिळताच, आरोग्य विभागाने आपल्या रुग्णवाहिका त्या-त्या तालुक्यात तयार ठेवाव्यात. आवश्यक ती सर्व पूर्वतयारी ठेवावी. नगरपरिषदांनी आपल्या हद्दीतील जुन्या इमारतींचे ऑडीट करावे. पूर नियंत्रण आराखड्याबरोबरच स्थलांतराचा आराखडाही तयार ठेवावा.

### महापालिका आक्रमक; होर्डिंग वाचविण्यासाठी...

महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील एमआयडीसी, रेल्वे, सिडको व इतर अस्थापनांच्या जागेत असलेल्या होर्डिंगचे सर्वेक्षण केले जात आहे. परवानगी घेतलेल्या आकारापेक्षा जास्त आकाराचे होर्डिंग लावले असल्यास त्यांच्यावरही कारवाई केली जाणार आहे. विभाग कार्यालयाकडून येणाऱ्या अहवालाप्रमाणे तत्काळ अनधिकृत होर्डिंग हटविण्याची कारवाई करण्यात येणार असल्याचे महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

गुरुवारीही होर्डिंगविरोधातील मोहीम सुरूच ठेवण्यात आली आहे. ठाणे-बेलापूर रोडवरील कोपरखैरणे विभागात मोहीम सुरू केली आहे. यापुढे सर्व अनधिकृत होर्डिंग हटविले जात नाहीत तो पर्यंत मोहीम सुरू ठेवली जाणार आहे.

होर्डिंगविरोधातील कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे

बेलापूर रेल्वे स्टेशन, अग्निशमन केंद्राच्या जवळ अशा दोन होर्डिंगवर कारवाई केली.

शिरवणे सेक्टर १ मधील प्लॉट क्रमांक ४३ वरील ३ होर्डिंग हटविले.

वाशी गावातील कृष्णा रेस्टॉरंटजवळील दोन अनधिकृत होर्डिंग तोडले.

सानपाडा स्टेशनच्या पूर्व भागातील ४ अनधिकृत होर्डिंग हटविली.

घणसोली गवळीदेव जवळील दिशादर्शक कमानीची लोखंडी फ्रेम हटविली.

ऐरोली सेक्टर ३ बसडेपो जवळील १, दिघा येथील हॉटेल मुंबई एक्सप्रेसजवळील २ होर्डिंग हटविले.

# जंगलातील आगींना जबाबदार कोण?

उत्तर काशी जिल्ह्यातील बराहत पर्वतरांगेपासून धरासू उपर्वतरांगांपर्यंत अनेक जंगले आहे. नोंदी पाहिल्यास आतापर्यंत १९.५५ हेक्टर वनक्षेत्र जळून खाक झाले आहे. धुरामुळे लोकांना श्वास घेण्यास त्रास होत असताना वन विभाग आग शमवण्यासाठी धडपड करत आहे. बाराहत रेंजमधील जंगलातील आग अनेक दिवस धुमसत राहिली. मुखेम पर्वतरांगेतील डांग आणि पोखरी गावालगतचे जंगल तसेच दंडा पर्वतरांगेतील चमकोट व दिलसौद परिसरातील जंगलेही आगीच्या भक्ष्यस्थानी पडली आहेत. धरसू पर्वतरांगेतील फेडी आणि सिल्क्यरालगतची जंगलेही जळताना दिसली. जंगलाला लागलेल्या आगीमुळे मौल्यवान वनसंपत्तीचे तसेच वन्यजीवांचे नुकसान होते; मात्र वन विभागाकडून जंगलातील आग रोखण्यासाठी खास प्रयत्न होताना दिसत नाहीत. जंगलातील आग नियंत्रणासाठी संसाधने वाढवण्यात आल्याचे वन विभागाचे म्हणणे आहे; परंतु त्यामुळे आगीच्या घटना कमी झालेल्या नाहीत. आग किती वेळात आटोक्यात येते, याला महत्त्व असते. वन विभागाची आकडेवारीच आगीच्या वाढत्या घटना आणि आग धुमसत राहण्याचे दिवस सांगते. त्यावरून अजून तरी जंगलांना आगीपासून वाचवण्यात आपल्याला फार यश आले आहे, असे दिसत नाही. भारतातील हवामानाच्या दृष्टीने एप्रिल ते जून या महिन्यांना जंगलांसाठी 'अग्नी हंगाम' असे म्हणतात; पण आगीच्या घटना डोंगराळ राज्यांमध्ये जास्त घडतात. उत्तराखंडच्या जंगलात सध्या असे घडत आहे. ही जंगले उत्तराखंडच्या सौंदर्याचा पाया आहेत. इथली संपूर्ण सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक रचना यावर अवलंबून आहे.

जनता आणि सरकारला हे माहीत आहे की उन्हाळ्याच्या महिन्यांमध्ये आग लागू शकते; परंतु तरीही आग वर्षानुवर्षे पसरत आहे. आग इतकी भीषण झाली आहे की जंगलातील आग शमवण्यासाठी हेलिकॉप्टर तैनात करण्यात आली आहेत. राज्यातील विविध भागांमधून जंगलाला आग लागण्याची ३१ नवी प्रकरणे समोर आली आहेत. यामुळे झाडे आणि प्राण्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान तर होतेच; शिवाय वायूप्रदूषण आणि उष्णतेची समस्याही या परिसराला भेडसावते. इतकेच नाही, तर उत्तराखंडच्या जंगलात आगीची आपत्ती दर वर्षी ओढवते. त्यात मानवी हस्तक्षेप हे प्रमुख कारण मानले जाते. या वेळीही असेच काहीसे घडले आहे. आता या प्रकरणात रुद्रप्रयागमधून तिघांना अटक करण्यात आली आहे. जंगलात आग लावण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. ही आग या डोंगराळ राज्याच्या नशिबी आहे की हा अज्ञानाचा परिपाक आहे, असा प्रश्न आगीची तीव्रता पाहून मनात येतो.

उत्तराखंड वन विभागाच्या आकडेवारीवरून दिसून येते की गेल्या वर्षी नोव्हेंबरपासून राज्यभरात जंगलाला आग लागण्याच्या किमान ६०६ घटना घडल्या आहेत. त्याचा परिणाम ७३५.८१५ हेक्टर क्षेत्रावर झाला आहे. जंगलातील आगीच्या २२० घटना गढवाल आणि ३३३ कुमाऊं विभागातील आहेत. ५३ घटना वन्य जीव क्षेत्रातील आहेत. उत्तराखंडमध्ये गेल्या दहा वर्षांमध्ये जंगलाला आग लागण्याच्या १४ हजारांहून अधिक घटना घडल्या आहेत. त्यात २३ हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावरील वनसंपत्ती बाधित झाली आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये जंगलातील आगीच्या घटनांमध्ये १७ जणांना जीव गमवावा लागला आहे, तर ७४ जण जखमी झाले आहेत. २०२१ मध्ये राज्यभरात जंगलाला आग लागण्याच्या २१८३ घटना घडल्या. त्यात ३,९४३ हेक्टर क्षेत्रातील वनसंपत्ती बाधित झाली. २०२० मध्ये कोरोना साथीमुळे लागू केलेल्या टाळेबंदीमुळे जंगलांमध्ये मानवी क्रियाकलाप कमी राहिला. त्यामुळे जंगलांना आग लागण्याच्या घटनांमध्ये विक्रमी घट झाली.

आग लागण्याला तीन बाबी कारणीभूत ठरतात. पहिले म्हणजे इंधन, दुसरे म्हणजे ऑक्सिजन आणि तिसरे म्हणजे उष्णता. जंगलात ऑक्सिजनची कमतरता नाही. याशिवाय झाडांची कोरडी पाने आणि फांद्या हे इंधनाचे मुख्य स्रोत असतात. पाइन आणि देवदारची झाडे डोंगरावर विपुल प्रमाणात आहेत. उष्णतेबद्दल बोलायचे तर उन्हाळ्याच्या हंगामात ते निश्चितपणे उद्भवते. राज्यात या वर्षी जानेवारीदरम्यान पाऊस आणि बर्फवृष्टी झाली नाही. नोव्हेंबर आणि डिसेंबरही कोरडेच राहिले. जंगलात आग लागण्याचे मुख्य कारण म्हणजे आर्द्रतेचा अभाव. 'एसओएफआर' या संस्थेने २०२० चा हवाला देऊन हवामानबदल आणि जंगलातील आग यांच्यातील दुवा मान्य केला आहे. अहवालात भारतीय जंगलांना हवामानबदलाचे 'हॉटस्पॉट' म्हटले आहे. डोंगरी भागातील राज्यांमध्ये तापमानात कमाल वाढ होईल आणि पावसात घट होईल, असा इशारा देण्यात आला आहे; पण यासाठी केवळ बदलत्या हवामानाला दोष देणे योग्य नाही.

जंगलात आग लागण्याची इतरही कारणे आहेत. उत्तराखंडच्या जंगलात अनेक प्रकारची पाने आहेत, सदाहरित झाडे आहेत. नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये पानगळती होते. नंतर वसंत ऋतूमध्येदेखील पाने पडतात. ही पाने सुईसारखी असतात. वैशिष्ट्य म्हणजे ती स्वतःच वाढतात आणि कुठेही उडतात. ही पाने उन्हाळ्यात ठिणगीचे काम करतात. एकदा आग लागली की ती शमवणे कठीण जाते. त्यासाठी ही जंगले सातत्याने स्वच्छ करण्याची गरज आहे. हिमालयातील समाज आणि पर्यावरणाचा अभ्यास करणारे डॉ. शेखर पाठक सांगतात, नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात वन विभागाकडून जंगलात 'फायर लाईन्स' बनवायचे केले जात असे. मात्र या प्रक्रियेत आता अत्यंत हलगर्जीपणा दिसतो. त्याचे परिणाम आपल्या सर्वांसमोर आहेत. पाइन सुयांच्या सहाय्याने वीजनिर्मितीची सुरुवात झाली; पण यालाही अनेक कारणांमुळे अडथळे आले आणि ते यशस्वी होऊ शकले नाहीत. या कामासाठी पाच ते दहा टक्के पाइन सुया वापरल्या गेल्या तर आपण खूप मोठ्या क्षेत्राचे संरक्षण करू शकतो.

उत्तराखंडमध्येच नाही, तर जगभरातील जंगलातील आगीच्या घटनांमागे मानवी हस्तक्षेप हे प्रमुख कारण मानले जाते. भारताच्या पर्यावरण मंत्रालयाअंतर्गत असलेल्या वन संशोधन संस्थेच्या २०१९ च्या अहवालानुसार, जंगलातील ९५ टक्के आगी मानवी चुकांमुळे लागतात. गावकरी अनेकदा जंगलात जमिनीवर पडलेली पाने किंवा सुकलेले गवत पेटवून देतात. त्यानंतर आग पसरत जाते आणि भडकली की अनियंत्रित होते आणि भयंकर रूप धारण करते. याशिवाय काही वेळा पर्यटक जळत्या सिगारेट किंवा इतर पदार्थ जंगलात टाकतात. त्यामुळे आग संपूर्ण जंगलात पसरते. बदलते हवामान आणि प्रशासकीय पातळीवरील दुर्लक्ष ही जंगलातील आगीची प्रमुख कारणे आहेत.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## थोडक्यात

### मुंबईत गुरुवारीही उष्मा आणि पावसाचा अंदाज



● मुंबई : मागील काही दिवसांपासून मुंबई तसेच उपनगरांत उकाड्यामुळे मुंबईकर हैराण झाले आहेत. मुंबईतील तापमानात बुधवारी झालेली वाढ गुरुवारीही कायम होती. त्यामुळे नागरिकांना असह्य उकाडा सोसावा लागत आहे. तसेच गुरुवारी दुपारनंतर काही भागात हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

आर्द्रतेमुळे घाम येऊन मुंबईकरांना बुधवारी त्रास झाला. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात बुधवारी ३७.६ तर, सांताक्रूझ केंद्रात ३७.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. सध्या कमी दाबाचा पट्टा सक्रिय असल्याने, तसेच वारे खंडित झाल्याने हवामान खात्याने पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. तसेच पावसाच्या शिडकाव्यामुळे तापमानात फारसा फरक पडणार नाही, असेही सूत्रांनी सांगितले.

मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड आणि रत्नागिरीमध्ये उष्मा जाणवेल. तसेच ४०-५० किमी वेगाने वारे वाहतील आणि हलका पाऊस पडण्याचा इशारा देण्यात आला आहे. धुळे, नाशिक, जळगाव आणि सांगली, सातारा भागात गडगडाटासह पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

### नोटीशीनंतरही महाकाय जाहिरात फलक कायम; पालिकेच्या नियमावलीस मध्य, पश्चिम रेल्वे प्रशासनाचा हरताळ




● मुंबई : घाटकोपर दुर्घटनेनंतर मुंबई रेल्वेच्या हद्दीत उभारलेले महाकाय जाहिरात फलक पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. महालक्ष्मी स्थानकालगत असलेले महाकाय फलक हटविण्यासाठी पालिकेच्या 'जी उत्तर' विभागाने रेल्वे प्रशासनाला गेल्यावर्षी नोटीस पाठवली होती. मात्र, पालिकेच्या नोटिशीकडे दुर्लक्ष करीत हे सगळे जाहिरात फलक महालक्ष्मी स्थानकालगत अद्यापही तसेच उभे असलेले दिसतात.

मुंबईत भलेमोठे जाहिरात फलक उभारण्यासाठी पालिकेची परवानगी घ्यावी लागते. त्यासाठी पालिकेच्या नियमावलीची अंमलबजावणी करावी लागते. मात्र, रेल्वे प्रशासन मुंबई महानगरपालिका प्रशासनाला याबाबत जुमानत नाही, हे वारंवार उघड झाले आहे. रेल्वेच्या हद्दीत जाहिरात फलक लावताना त्याकरीता पालिकेची परनवानगीही घेतली जात नाही. तसेच त्यासाठीचे परवाना शुल्कही भरले जात नाही आणि त्यासाठी नियमही पाळले जात नाहीत.

अनेक जाहिरात फलक रेल्वेच्या हद्दीत उभारले असून त्याचा पुढचा जाहिरातीचा भाग अनेक ठिकाणी थेट रस्त्यावर आलेला आहे. वांद्रे स्थानकातही पूर्व दिशेला असाच एक भलामोठा जाहिरात फलक लावण्यात आला आहे. महालक्ष्मी स्थानक परिसरात सेनापती बापट मार्गाकडून रखांगी चौकापर्यंतच्या रस्त्यावर असेच किमान पाच ते सहा महाकाय जाहिरात फलक लावण्यात आले आहेत. ते पदपथ आणि रस्त्यावर आलेले आहेत. त्यामुळे हे जाहिरात फलक काढून टाकावे, अशी सूचना पालिकेच्या 'जी दक्षिण' विभाग कार्यालयाने पश्चिम रेल्वेला गेल्यावर्षी जुलै महिन्यात केली होती. याबाबत पालिका प्रशासनाने २०१९ पासून पश्चिम रेल्वेला अनेक पत्रे पाठवली असून गेल्या पावसाळ्यातही स्मरणपत्र पाठवले होते. मात्र रेल्वेने हे फलक अद्याप हटवलेले नाहीत. घाटकोपरच्या दुर्घटनेनंतर हे फलक पुन्हा चर्चेत आले आहेत. रेल्वे प्रशासनाने लावलेल्या जाहिरात फलकांचे खांब रेल्वेच्या हद्दीत असले तरी त्याचा जाहिरातीचा वरचा अवजड लोखंडी भाग हा रस्त्यावर येत असतो. महालक्ष्मी स्थानकालगत असलेले महाकाय फलक हटविण्यासाठी पालिकेच्या 'जी उत्तर' विभागाने रेल्वे प्रशासनाला गेल्यावर्षी नोटीस पाठवली होती.

फलकांवर मद्याच्याही जाहिराती

जाहिरात फलक कोसळल्यास पादचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. असे या नोटीसीत म्हटले होते. जाहिरात फलकाचा लोखंडी सांगाडा कमकुवत होऊन किंवा वादळवाऱ्यात कोसळल्यास ते रस्त्यावर पडतील, त्यामुळे मोठी दुर्घटना होऊ शकते.

## सेवा निवृत्त आणि ज्येष्ठांच्या गृहनिर्माण प्रकल्पांसाठी महारेराची नियमावली लागू



● मुंबई : राज्यात अनेक ठिकाणी सेवा निवृत्त आणि ज्येष्ठांसाठी गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येतात. मात्र अनेक वेळा या प्रकल्पांमध्ये सेवा निवृत्त आणि ज्येठांच्या दृष्टीने आवश्यक अशा सोयी-सुविधा उपलब्ध करण्यात येत नाहीत. त्यामुळे त्यांची गैरसोय होते. ही बाब लक्षात घेता आता महारेराने सेवा निवृत्त आणि ज्येष्ठांच्या गृहनिर्माण प्रकल्पासाठी नवीन नियमावली तयार केली आहे. ही नियमावली राज्यभर लागू करण्यात आली असून या नियमवलीचे पालन करणे विकासकांना बंधनकारक करण्यात आले आहे.

सेवा निवृत्तीनंतर वा उतारवयात शांत, निसर्गरम्य वातावरणात वास्तव्य करण्याकडे कल वाढत आहे. तर दुसरीकडे विकासकही या घटकांसाठी स्वतंत्र प्रकल्प राबवित आहेत. मात्र हे प्रकल्प राबविताना विकासक या घटकांच्या गरजा लक्षात घेऊन सोयी-सुविधा उपलब्ध करीत नाहीत. अनेक वेळा सुविधा केवळ कागदावर असतात. यामुळे त्यांची फसवणूक होते. ही बाब लक्षात घेता आता महेराने फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सेवानिवृत्त आणि ज्येष्ठांच्या गृहनिर्माण प्रकल्पांसाठी मार्गदर्शक तत्वांचा मसुदा तयार केला असून तो सूचना आणि मतांसाठी जाहीर केला होता. अनेकांनी या प्रस्तावाचे स्वागत करून अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या होत्या. यात ज्येष्ठ नागरिकांच्या संस्था आणि काही ज्येष्ठ नागरिकांनी स्वतंत्रपणेही सूचना केल्या होत्या. या सर्व सूचनांचा समावेश करून सेवा निवृत्त आणि ज्येष्ठांच्या प्रकल्पाच्या नियमावलीला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. ही नियमावली आता राज्यभर लागू करण्यात आली आहे.

सेवानिवृत्त आणि ज्येष्ठांसाठी किमान प्रत्यक्ष निकष / विनिर्देशांची सविस्तर नियमावली महारेराने एका परिपत्रकाद्वारे जाहीर केली आहे. सेवानिवृत्त आणि ज्येष्ठांसाठी उभारण्यात येणाऱ्या सर्व गृहनिर्माण प्रकल्पांच्या नियमावलीत त्यांच्या प्राथमिक गरजा लक्षात घेऊन इमारतीचे संकल्पचित्र, स्वयंपाकघर, स्नानगृह, उद्वाहन आणि रॅम्पस, जीना, छिन्नमार्ग, प्रकाश योजना आणि वायुविजन, सुरक्षा आणि सुरक्षितता आदी सुविधांबाबत कोणती काळजी घ्यावी याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. या किमान प्रत्यक्ष निकष / विनिर्देशानुसार हे प्रकल्प बांधावे लागतील. त्यासाठी या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे विकासकांना बंधनकारक आहे. ही नियमावली राज्यात लागू करण्यात आलेली आहे. आता विकासकांना या तरतुदींचा विक्री करारातही योग्य पध्दतीने समावेश करावा लागणार आहे. या नियमावलीचे पालन न केल्यास विकासकांना कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.

नियमावलीतील काही महत्त्वाच्या तरतुदी अशा...

एका मजल्यापेक्षा जास्त मजल्याच्या इमारतीला उद्वाहन आवश्यक. शिवाय व्हीलचेअर किंवा तत्सम साधनांची मदत घेता येईल, अशी रचना असावी.

इमारतीच्या आतील आणि बाहेरील भागात व्हीलचेअरने कुठल्याही अडथळ्याशिवाय फिरता येईल असे आरेखन असावे.

आवश्यक तेथे रॅम्पसची व्यवस्था, त्यादृष्टीने दरवाजेही ९०० एमएमपेक्षा मोठे असावे. प्राधान्याने स्लायडिंगचे दरवाजे असल्यास उत्तमच. ४ दरवाज्याचे हँडल्स, कड्या सहजपणे व्यवस्थित पकडता येतील असे आणि दणकट असावे.

## मोदींच्या कल्याणमधील सभेसाठी मुरबाड भागात बस न पाठविल्याने कथोरे समर्थक नाराज




● कल्याण : भिवंडी लोकसभेचे भाजपचे उमेदवार केंद्रीय मंत्री कपील पाटील आणि मुरबाडचे भाजपचे आमदार किसन कथोरे हातात हात घालून एकत्रित प्रचार करत असताना पाटील समर्थक काही पदाधिकारी कथोरे समर्थकांना लोकसभा निवडणूक वातावरणातही दुजाभावाची वागणूक देत असल्याने कथोरे समर्थकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बुधवारी कल्याणमध्ये प्रचार सभा होती. या सभेसाठी मुरबाड भागातील भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी, नागरिकांनी अधिक संख्येने यावे म्हणून या भागाचे आमदार किसन कथोरे यांनी जय्यत तयारी केली होती. या तयारीप्रमाणे कपील पाटील यांच्याकडून मुरबाड भागात या कार्यकर्त्यांना कल्याण मधील सभा ठिकाणापर्यंत आणण्यासाठी बसची व्यवस्था केली जाईल, असे आमदार कथोरे समर्थकांना वाटले होते. परंतु, ठरल्याप्रमाणे मुरबाडमधील काही भागात भाजप कार्यकर्त्यांना आणण्यासाठी पाटील समर्थकांकडून बस पाठविण्यात आल्या नाहीत, त्यामुळे भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा हिरमोड झाल्याचे समजते.

सकाळी ११ वाजल्यापासून मुरबाड मधील अनेक नागरिक, भाजप कार्यकर्ते आपल्या गावच्या नाक्यावर उमेदवार कपील पाटील यांच्याकडून पाठविण्यात येणाऱ्या बसची वाट पाहत बसले होते. शेवटपर्यंत बस न आल्याने कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली. कथोरे गावागावात मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करायचे असल्याने त्यांच्या विजयासाठी कपील पाटील यांच्या विजयासाठी कथोरे यांनी मुरबाड विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक गाव पिंजून काढला आहे. कोणत्याही परिस्थितीत पाटील हे मोठ्या मताधिक्याने निवडून येतील यासाठी कथोरे प्रयत्नशील असल्याचे त्यांच्या समर्थकांनी सांगितले.

### निमंत्रणावरून कथोरे बाद

**मोदी यांच्या सभेसाठी विशेष निमंत्रितांसाठी तयार करण्यात आलेल्या विशेष अति महत्वाच्या व्यक्तिसाठी तयार करण्यात आलेल्या प्रवेश पासवर पंतप्रधान नरेंद्र मोदी ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, श्रमजिवी संघटनेचे विवेक पंडित, कुणबी सेनेचे विश्वनाथ पाटील असे एकूण २८ जणांच्या प्रतिमा आहेत. या मध्ये मुरबाड मतदारसंघाचे आमदार असुनही आणि या भागाचे तारांकित प्रचारक असुनही किसन कथोरे यांची या विशेष पासवर प्रतिमा नाही. त्यामुळेही कथोरे समर्थक नाराज झाले आहेत.**

**कपील पाटील यांना कथोरे यांच्या प्रचार कामाविषयीची माहिती आहे, पण कपील पाटील यांचे उजवे, डावे समर्थक कथोरे यांना प्रत्येक गोष्टीत डावलून पाटील आणि कथोरे यांच्यात दुरावा निर्माण करत असल्याचे भाजपच्या एका ज्येष्ठ पदाधिकाऱ्याने सांगितले.निवडणुकीच्या तोंडावर अशाप्रकारे कटु वातावरण आवश्यक नसताना ते मुद्दाम निर्माण केले जात असल्याबद्दल भाजपच्या मुरबाड भागतली अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. पाटील समर्थकांनी मात्र मुरबाड भागात वेळेवर बस पाठविल्या होत्या, असे सांगितले.**

> भिवंडी,कल्याणमधील महायुतीचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. आपण कपील पाटील यांचा कार्यकर्त्यांना घेऊन प्रचार करत आहोत. कोठेही नाराजी, कुरबुरीचे वातावरण नाही. कुठे असेल तर ते तात्काळ शमविले जाते. काल मोदींच्या सभेसाठी मुरबाड भागातून बहुतांशी कार्यकर्ते दाखल झाले होते.
>
> **- किसन कथोरे, आमदार, मुरबाड विधानसभा.**

## नाईक आनंदाश्रमात फिरकलेच नाहीत

● ठाणे : ठाणे लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकी निमित्त बुधवारी रात्री उशिरा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातील टेंभी नाका येथे बोलविलेल्या विशेष बैठकीसाठी नवी मुंबईतील भाजपाचे नेते गणेश नाईक यांचे पुत्र संदीप नाईक आणि संजीव नाईक आनंद आश्रमाच्या दिशेने गेले खरे मात्र आनंद मठात प्रवेश न करताच ते पुन्हा माघारी परतले. आनंद मठाऐवजी लगेचच असलेल्या चिंतामणी चौकात मुख्यमंत्र्यांच्या प्रतीक्षेसाठी हे दोन नाईक बंधू आपल्या वाहनातच बसून होते. मात्र मुख्यमंत्री उशिरापर्यंत आनंद मठ येथे आले नाहीत आणि त्यांची वाट पाहून नाईक बंधू परतले.

नवी मुंबईतील भाजपाचे मातब्बर नेते गणेश नाईक आणि मुख्यमंत्र्यांचे गुरु तसेच शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख दिवंगत आनंद दिघे यांचे कधीच फारसे सख्य नव्हते. नाईकांनी शिवसेना सोडली आणि २००० सालच्या निवडणुकीत ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घड्याळ या चिन्हावर निवडणुकीच्या रिंगणात उतरले. त्यावेळी सिताराम भोईर या अगदी नवख्या उमेदवाराला रिंगणात उतरवून आनंद दिघे यांनी नाइकांचा अडीच हजार मतांनी पराभव केला होता. तेव्हापासून नाईक आणि दिघे यांच्यात अधिकच बिनसले. थोरले नाईक दिघे यांच्या मृत्यूनंतरही कधी टेंभी नाका येथील आनंदाश्रमात गेले नाहीत की त्यांच्या समाधीचेही दर्शन त्यांनी घेतलं नाही. बुधवारी रात्री



काही दशकानंतर नाईक यांचे दोन पुत्र संजीव आणि संदीप मात्र आनंद आश्रमाच्या दिशेने एका बैठकीच्या निमित्ताने आलेले पाहायला मिळाले. ठाणे लोकसभा मतदार संघातील निवडणूक तयारीच्या निमित्ताने आणि नवी मुंबई मीरा भाईंदर या शहरांमधील आमदार महायुतीचे नेते पदाधिकारी यांची एक तातडीची बैठक मुख्यमंत्र्यांनी बोलावली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भिवंडीतील सभा आणि मुंबईतील रोड शो आटोपून मुख्यमंत्र्यांनी आपला ताफा जोगेश्वरीला रवींद्र वायकर यांच्या मतदारसंघाकडे वळविला.

दरम्यानच्या काळात आणि लोकसभेतील महायुतीच्या नेत्यांना रात्री नऊ वाजल्यापासूनच आनंदाश्रमात बोलवण्यात आले होते. नवी मुंबईतील शिंदे सेनेचे नेते विजय नाहता, जिल्हाप्रमुख विजय चौगुले, प्रमुख समन्वयक किशोर पाटकर यांच्यासह या भागातील ज्येष्ठ नगरसेवक आनंदाश्रमात दाखल झाले होते. ओवला माजिवडा मतदारसंघाचे आमदार प्रताप सरनाईक, मीरा-भाईंदरच्या आमदार गीता जैन, मीरा-भाईंदर मधील भाजप नेते नरेंद्र मेहता, महाडचे आमदार भरत गोगावले यासारखे नेतेही आनंद आश्रमात दाखल झाले होते. साधारण रात्री साडेदहा वाजल्यापासून मुख्यमंत्री येणार अशी चाहूल आनंद आश्रमात सर्वांना लागली होती. याच काळात गणेश नाईक यांचे पुत्र संदीप आणि संजीव यांच्या वाहनांचा ताफा ही आनंदाश्रमाच्या दिशेने आला. नाईक पुत्रांचा हा ताफा पाहून टेंभी नाक्या भोवती जमा असलेल्या राजकीय गर्दीचे डोळे विस्फारले.

■ २००० झाली झालेल्या विधानसभा निवडणुकीतील पराभवनंतर नाईक कुटुंबातील कुणीही आनंद आश्रमात पाऊल ठेवलेले नाही. मात्र खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच बोलविलेल्या बैठकीसाठी नाईक पुत्रांना आनंद आश्रमाच्या दिशेने यावेच लागले. मुख्यमंत्र्यांनी निरोप धाडूनही थोरले नाईक काही आश्रमातील बैठकीसाठी आले नाहीत. रात्री साडेदहा पावणे अकराच्या सुमारास नाईक पुत्र वाहनांमधून आनंद आश्रमाच्या दिशेने आले खरे मात्र आश्रमात येण्याऐवजी त्यांनी तलाव पाळी लगत असलेल्या चिंतामणी चौकात आपली वाहने उभी केली. आणि बराच काळ ते वाहनांमध्ये बसून होते.

## घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेला तत्कालीन लोहमार्ग पोलीस आयुक्त जबाबदार? २०२३ ला उघडकीस आलं होतं प्रकरण!

● घाटकोपर माजी लोहमार्ग पोलीस आयुक्त कैसर खालिद यांनी महाराष्ट्र पोलिस महासंचालक (डीजीपी) कार्यालयाची परवानगी न घेता घाटकोपर येथे होर्डिंगच्या कामाला परवानगी दिली होती, असे एका वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याने सांगितले. होर्डिंग उभारण्यासाठी परवानगी देण्यापूर्वी डीजीपी कार्यालयाची पूर्वपरवानगी आवश्यक असतानाही खालिद यांनी रेल्वे पोलिसांच्या जमिनीवर होर्डिंग उभारण्यासाठी इगो मीडिया प्रायव्हेट लिमिटेडला मंजुरी दिली होती. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

प्रकरण उघडकीस आल्यानंतर अंतर्गत चौकशी

नवीन जीआरपी आयुक्त रवींद्र शिसवे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर आणि कथित अनियमितता शोधल्यानंतर २०२३ च्या सुरुवातीला हे प्रकरण उघडकीस आले होते, असंही या अधिकाऱ्यांनी सांगितलं. "त्यांनी अंतर्गत चौकशीचे आदेश दिले, प्रकल्पाच्या कागदपत्रांचे विश्लेषण केले आणि त्याबद्दल डीजीपी कार्यालयाला अहवाल सादर केला", असे वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर इंडियन एक्सप्रेसला सांगितले. या अहवालाच्या आधारे, DGP कार्यालयाने ADG रँकचे IPS अधिकारी खालिद यांना कारणे दाखवा नोटीस जारी केली आहे. कैसर खालिद हे महाराष्ट्र प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राइट्समध्ये कार्यरत आहेत.

## इंधनासाठी पेट्रोल पंपावर थांबले अन् तेवढ्यात होर्डिंग कोसळलं; दाम्पत्याचा मृत्यू

● घाटकोपरमध्ये जाहिरातीचे होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेत आणखी दोन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती काल रात्री (दि. १५ मे) समोर आली. यामुळे आता मृतांची संख्या १६ वर पोहोचली आहे. काल एका वाहनातून मनोज चांसोरिया (वय ६०) आणि त्यांची पत्नी अनिता चांसोरिया (वय ५९) यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. मनोज चांसरिया हे मुंबईतील विमानतळाचे माजी विमानतळ संचालक (Air Traffic Control – ATC) होते. जाहिरातीचे होर्डिंग कोसळले तेव्हा इतर १०० लोकांसारखे तेही पेट्रोल पंपावर इंधन भरण्यासाठी आले होते. मनोज चांसरिया यांनी मुंबईच्या एटीसीमध्ये काम केले होते. वर्षभरापूर्वीच निवृत्त झाल्यानंतर ते पत्नीसह जबलपूर येथे वास्तव्यास होते.

चांसोरिया दाम्पत्याच्या मृत्यूमुळे मुंबईमधील एटीसी विभागातील कर्मचाऱ्यांनी हळहळ व्यक्त केली. एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती, अशी आठवण इतर कर्मचाऱ्यांनी सांगितली. चांसोरिया दाम्पत्याचा मुलगा अमेरिकेत आहे. तेही काही दिवसांनी देशाबाहेर जाणार असल्यामुळे व्हिसासंबंधी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मुंबईत आले होते. व्हिसाची प्रक्रिया पूर्ण करून जबलपूरला परत जात असताना वाटेत इंधन भरण्यासाठी ते पेट्रोल पंपावर थांबले आणि तेवढ्यात काळाने त्यांच्यावर घाला घातला.

## ठाकरे गटाकडून पाकिस्तानची हुजरेगिरी; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची टीका

● ठाणे : इंडिया आघाडी पराभवाच्या भीतीने भरकटली आहे. ठाकरे गटाने पाकिस्तानची हुजरेगिरी सुरू केली आहे. मुंबई बॉम्बस्फोटाचा आरोपी इक्बाल मुसा याला निवडणुकीत उतरविले आहे. त्याच्या मिरवणुकीत पाकिस्तानचे झेंडे फडकू लागले आहेत, अशी घणाघाती टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी कल्याण येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत केली. महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी कल्याण येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी



उद्धव ठाकरे यांच्यावर टीकास्त्र डागले. निवडणुकीचा महाराष्ट्रातील अखेरचा टप्पा सुरू होत असताना मुख्यमंत्र्यांनी मुस्लीम तुष्टीकरणाच्या मुद्द्यावरून उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षावर टीकेचे प्रहार सुरू केले आहेत.

## रणरणत्या उन्हात कार्यकर्ते कल्याणमधील मोदींच्या सभेसाठी

### भिवंडी, कल्याण ग्रामीण भागातून सर्वाधिक गर्दी

● कल्याण : रणरणते ऊन, घामाच्या धारांनी हैराण झालेले असताना भिवंडी, कल्याण लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे कार्यकर्ते कल्याण मधील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जाहीर सभेसाठी उपस्थित झाले आहेत. कार्यकर्त्यांमध्ये महिला, पुरूषांचा सर्वाधिक सहभाग आहे. कडेकोट सुरक्षा व्यवस्थेमुळे गर्दी असुनही कोठेही गोंधळ होणार नाही याची दक्षता घेतली जात आहे.

मोदी यांच्या सभेसाठी सुमारे एक लाख खुर्च्या सभा मंडपात लावण्यात आल्या आहेत. या सर्व खुर्च्या केवळ



महायुतीच्या कार्यकर्त्यांमुळे भरणार नसल्याने कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी शहापूर, मुरबाड, भिवंडी ग्रामीण भागातील सामान्य महिला, पुरुष नागरिकांना 'बांधिव' कार्यकर्ते म्हणून विशेष बस उपलब्ध करून सभास्थळी आणले आहे. या नागरिकांच्या गळयात भाजप, शिवसेनेचे झेंडे, गमछे दिसून येत आहेत.


मोदी यांची सभा दुपारी दोन वाजता असल्याचा निरोप असल्याने सकाळी १० वाजल्यापासून शहापूर, मुरबाड, भिवंडी ग्रामीण, शहरी भागात कार्यकर्त्यांनी गावच्या नाक्यावर जमा होण्यास सांगितले होते. ही सभा संध्याकाळी पाच वाजता असल्याचे समजल्यावर मात्र कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला. रणरणत्या उन्हात प्रवास करून आलेल्या कार्यकर्त्यांना आच्छादित सभा मंडपामुळे दिलासा मिळत आहे.

## आईने सहा वर्षांच्या चिमुरड्याकडून शूट करून घेतला प्रियकराबरोबरचा खासगी व्हिडीओ



● नवी मुंबई - सहा वर्षाच्या मुलाला खासगी व्हिडिओ शूट करण्यास सांगितल्या प्रकरणी उरण पोलिसांनी २५ वर्षीय महिला आणि तिच्या ३५ वर्षीय मित्रावर गुन्हा दाखल केला आहे. पनवेल सत्र न्यायालयाने पोलिसांना तसे निर्देश दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. फ्री प्रेस जर्नलने यासंदर्भातील वृत्त दिलं. एका पोलिस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, महिलेने तिच्या मित्रावर बलात्काराचा गुन्हा दाखल केला होता. खटल्यादरम्यान पुरावा म्हणून व्हिडीओ न्यायालयात सादर करण्यात आला. हा व्हिडीओ तिसऱ्या व्यक्तीने शूट केल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. याबाबत महिलेला विचारले असता हा व्हिडिओ तिच्या मुलाने शूट केला असल्याचं तिने सांगितलं. चौकशी केली असता, मुलाने सांगितले की, त्याने त्याच्या 'काकांच्या' (सहआरोपी) सांगण्यावरून असे केले होते." "एका अल्पवयीन मुलाने दोन अश्लील व्हिडीओ काढण्यात आल्याचे कळताच न्यायालयाने बलात्कार प्रकरणातील आरोपीच्या जामीन अर्जावर सुनावणी करताना पोलिसांना एफआयआर नोंदविण्याचे निर्देश दिले, त्यानंतर उरण पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला", अशी माहितीही पोलिसांनी दिली.

## ‘जोपर्यंत गंभीर हसत नाही...’ चाहतीच्या ‘त्या’ पोस्टरला गौतमने दिले उत्तर



आयपीएल २०२४ मध्ये प्लेऑफसाठी पात्र होणारा कोलकाता नाईट रायडर्स हा पहिला संघ ठरला. विजयीरथावर स्वार असलेला केकेआरचा संघ कर्णधार श्रेयस अय्यरच्या नेतृत्त्वाखाली उत्कृष्ट कामगिरी करत आहे. इतकंच नव्हे तर केकेआरने क्वालिफायरचे तिकिटही मिळवले आहे आणि हा हंगाम संपेपर्यंत कोलकाताचा संघ टॉप-२ मध्येच राहणार आहे. यंदाच्या मोसमात केकेआरचा सर्वात यशस्वी कर्णधार राहिलेला गौतम गंभीर मेंटॉरच्या रूपात पुन्हा एकदा संघामध्ये परतला. त्याच्या मार्गदर्शनाखाली संघाने आतापर्यंत जबरदस्त कामगिरी केली. गंभीर हा फार कमी वेळेस दिलखुलास हसताना आपल्याला दिसतो. गौतम गंभीर संघाच्या कामगिरीवर खूश असला तरी गंभीरला आपण फार कमी वेळेस हसताना पाहिलं आहे. यादरम्यान केकेआरच्या एका सामन्यात त्याच्या चाहतीने एक पोस्टर घेतलेला फोटो व्हायरल होत आहे, ज्याला आता गंभीरने उत्तर दिले आहे. स्टेडियममध्ये एक चाहती गौतम गंभीरचे पोस्टर घेऊन उभी असल्याचे दिसले, ‘जोपर्यंत गंभीर हसत नाही तोपर्यंत मी माझ्या क्रशला प्रपोज करणार नाही’, असं त्या पोस्टरवर लिहिलं होतं, हे पाहून गौतम गंभीरनेही एक पोस्ट शेअर केली. त्याने त्याच्या अधिकृत इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यामध्ये एका बाजूला गंभीर हसत आहे तर दुसऱ्या बाजूला पोस्टरसोबत त्या चाहतीचा फोटो आहे.

### ...तर तुम्ही मला बराच काळ पाहू शकणार नाही”

# भारताचा रनमशीन विराट कोहलीचं निवृत्तीबाबत मोठं वक्तव्य

भारताचा रनमशीन म्हणून ओळखला जाणारा विराट कोहलीने आरसीबीच्या महत्त्वाच्या सामन्यापूर्वी त्याच्या निवृत्तीबाबत मोठे वक्तव्य केले. विराट कोहलीने आपल्या शानदार फलंदाजीच्या जोरावर जागतिक क्रिकेटवर आपला ठसा उमटवला आहे. यंदाच्या आयपीएलमध्येही विराट कोहलीची बॅट चांगलीच तळपताना दिसत आहे. सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत पहिल्या स्थानी आहे. यंदाची ऑरेंज कॅपही विराटच्या नावे असू शकते. आरसीबीचा पुढील महत्त्वाचा सामना चेन्नईविरूद्ध होणार आहे, हा सामना प्लेऑफच्या दृष्टीने आरसीबीसाठी करो या मरो असेल. पण या सामन्यापूर्वीच्या संघाच्या डिनर पार्टीमध्ये विराट नेमकं काय म्हणाला जाणून घेऊया.

आरसीबीने सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या व्हिडिओमध्ये ३५ वर्षीय कोहलीला विचारलं की अशी कोणती गोष्ट आहे जी तुम्हाला सातत्याने खुणावत असते, जी पूर्ण करण्याची भूक आहे. यावर कोहली म्हणाला की., “ही अगदी साधी गोष्ट आहे. मला वाटतं, एक खेळाडू म्हणून, आमच्या करिअरलाही पूर्णविराम देणारा दिवस आहे. म्हणून मी सातत्याने आपले काम चोख करत आहे. अरे मी त्यादिवशी असं केलं असतं तर बरं झालं असतं, असे विचार करत मला माझी कारकीर्द थांबवायची नाही. त्यामुळे कोणतंही काम अपूर्ण ठेवत आणि त्याचा नंतर पश्चताप न करण्याबद्दल ही गोष्ट आहे आणि मला खात्री आहे की मी असं करणार नाही.” क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर पुढे काय करणार, याचा विचार करण्यापूर्वी तो दीर्घकाळ विश्रांती घेईल, असे संकेतही कोहलीने दिले. निवृत्तीविषयी बोलताना त्याने शेवटी एक महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे, कोणतीही खंत न बाळगता आपली कारकीर्द संपवण्याची इच्छा त्याने व्यक्त केली आणि जोपर्यंत तो खेळणे थांबवत नाही तोपर्यंत आपले सर्वोत्तम देण्याची इच्छा असल्याचे सांगितले.



विराट याबाबत बोलताना पुढे म्हणाला, “जेव्हा मी खेळणं थांबवेन त्यानंतर बराच काळ तुम्ही मला पाहू शकणार नाही. कारण मी मोठ्या सुट्टीवर जाईन. जोपर्यंत मी खेळत आहे तोवर १०० टक्के प्रयत्न द्यायचे आहेत. हीच गोष्ट मला वाटचाल करण्यासाठी प्रेरित करते.”

कोहली सध्या चालू असलेल्या IPL 2024 मध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत आघाडीवर आहे, त्याने १३ डावांमध्ये १५५.१६ च्या स्ट्राइक रेटने तब्बल ६६१ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने पाच अर्धशतके आणि एक शतक झळकावले आहे. १३ सामन्यांत १२ गुणांसह सध्या आयपीएल गुणतालिकेत पाचव्या स्थानावर असलेल्या RCBला या शनिवारी, CSK विरुद्ध महत्त्वाचा सामना खेळावा लागणार आहे. प्लेऑफसाठी शर्यतीत कायम राहण्यासाठी , RCB ला CSK चा नेट रेन रेट मागे टाकण्यासाठी निर्णायक विजय मिळवणे आवश्यक आहे. चेन्नई सुपर किंग्स संघाचा नेट रन रेट अधिक ०.५२८ आहे, तर RCB चा नेट रन रेट अधिक ०.३८७ आहे. आयपीएलनंतर भारताचा माजी कर्णधार पुढील महिन्यात यूएसए आणि वेस्ट इंडिजमध्ये सुरू होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघाचा भाग आहे. भारताचा माजी फिरकीपटू हरभजन सिंगने अलीकडेच कोहलीला संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सोपविण्याबाबत विचार करायला हवे असे सांगितले.

## वर्ल्डकप जिंकण्यापेक्षा दक्षिण आफ्रिकेला चिंता भेडसावतेय कोटा सिस्टमची, रबाडाची दुखापत ठरलंय निमित्त



आयपीएलमधील पंजाब किंग्स संघाचा वेगवान गोलंदाज आणि दक्षिण आफ्रिकेचा महत्त्वाचा खेळाडू कगिसो रबाडा हा मायदेशी परतला आहे. टी-२० विश्वचषक २०२४ तोंडावर असताना त्याची दुखापत दक्षिण आफ्रिकेसाठी मोठी डोकेदुखी ठरली आहे. क्रिकेट दक्षिण आफ्रिका (CSA) ने बुधवारी सांगितले की पंजाब किंग्जचा स्टार वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा सॉफ्ट दुखापतीमुळे मायदेशी परतला.

क्रिकेट दक्षिण आफ्रिकेने असेही म्हटले आहे की वेगवान गोलंदाजावर त्याच्या वैद्यकीय पथकाने बारकाईने लक्ष ठेवले आहे. दक्षिण आफ्रिकेला आशा आहे की दुखापतीमुळे पुढील महिन्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या तयारीवर परिणाम होणार नाही. धरमशाला येथे आरसीबीविरुद्धचा सामना गमावण्यापूर्वी रबाडा पीबीकेएसकडून हंगामातील प्रत्येक सामन्यात खेळला. त्याने ११ सामन्यात फ्रँचायझीसाठी ११ विकेट घेतले. टी-२० विश्वचषकासाठी दक्षिण आफ्रिकेने आधीच संघ जाहीर केला आहे. ज्यामध्ये रबाडाचा समावेश आहे. पण सध्या आफ्रिका क्रिकेट बोर्डाला संघ निवडीवरून टिकेचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे वर्ल्डकपपेक्षाही संघाला कोटा सिस्टिमची अधिक चिंता भेडसावत आहे. रबाडाने टी-२- वर्ल्डकपमध्ये खेळणं दक्षिण आफ्रिकेसाठी अधिक महत्त्वाचे आहे.

# ‘स्वातंत्र्य वीर सावरकर’ ते ‘मडगांव एक्सप्रेस’, OTT वर होणार मनोरंजनचा धमाका



ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर महिन्याच्या सुरुवातीला ‘हीरामंडी: द डायमंड बाजार’ सीरिज प्रदर्शित झाली. या सीरिजची जोरदार चर्चा सुरू असतानाच आता १७ मे रोजी आणखी काही कलाकृती प्रदर्शित होणार आहेत. खरं तर ओटीटीवर दर आठवड्याला कोरियन, इंग्रजी, हिंदी, दक्षिणात्य भाषेतील अनेक चित्रपट व सीरिज येतात. आता मे महिन्याच्या तिसऱ्या वीकेंडला ओटीटीवर मनोरंजनाचा धमाका होणार आहे. या शुक्रवारी ओटीटीवर बरेच चित्रपट अन् सीरिज रिलीज होणार आहेत.

रणदीप हुड्डाची मुख्य भूमिका असलेल्या ‘स्वातंत्र्यवीर सावरकर’ चित्रपटापासून ते ‘मडगांव एक्सप्रेस’ पर्यंत अनेक चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. यामध्ये विकी कौशल व सारा अली खानच्या एका चित्रपटाचा समावेश आहे, हा चित्रपट तब्बल ११ महिन्यांनी ओटीटीवर येणार आहे.

मॅडम वेब

डकोटा जॉन्सनची मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट एका महिला शास्त्रज्ञाविषयी आहे, जी एका कोळीच्या शोधात आहे. त्या कोळीने सोडलेल्या रसायनांमध्ये माणसांना बरं करण्याची अद्भुत शक्ती आहे. ही सीरिज १७ मे पासून नेटफ्लिक्सवर पाहता येईल.

मॉन्स्टर

मॉन्स्टर ही नेटफ्लिक्सची सीरिज आहे. यात थ्रिलर आणि सस्पेन्सचा मिलाफ असेल, ही इंडोनेशियन सीरिज प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

अवघ्या २० कोटींचं बजेट अन् कमावले २२५ कोटी, एकही अभिनेत्री नसलेला ‘हा’ सिनेमा ओटीटीवर होणार प्रदर्शित

बाहुबली: क्राउन ऑफ ब्लड

एसएस राजामौली यांचा ब्लॉकबस्टर चित्रपट ‘बाहुबली’ आता ॲनिमेशन सीरिजच्या रुपात पाहता येणार आहे. महिष्मती सिंहासनासाठी प्रभास आणि राणा दग्गुबती यांच्यातील ही लढाई तुम्ही १७ मे रोजी हॉटस्टारवर पाहू शकता.

जरा हटके जरा बचके

‘जरा हटके जरा बचके’ हा चित्रपट गेल्या वर्षी जूनमध्ये प्रदर्शित झाला होता. ११ महिन्यांनंतर हा चित्रपट आता ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. १७ मे पासून जिओ सिनेमावर विकी कौशल आणि सारा अली खान यांची केमिस्ट्री पाहायला मिळणार आहे.

ओटीटीवरील सर्वात भयावह सिनेमे अन् वेब सीरिजची यादी, ‘या’ कलाकृती पाहून स्वतःच्या सावलीचीही वाटेल भीती

बस्तर: द नक्सल स्टोरी

हा चित्रपट १५ मार्च रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. थिएटरनंतर हा चित्रपट आता ZEE5 वर १७ मे रोजी प्रदर्शित होणार आहे.

मडगांव एक्सप्रेस

गोव्याला फिरायला जाणाऱ्या तीन मित्रांची कथा या चित्रपटात दाखवण्यात आली आहे. यात कुणाल खेमू, अविनाश तिवारी व दिव्येंदू शर्मा तसेच अभिनेत्री नोरा फतेही आहे. हा चित्रपट डिस्ने प्लस हॉटस्टारवर १७ मे रोजी प्रदर्शित होणार आहे.

## “ती मला समजू शकली नाही”, ‘हीरामंडी’ फेम अभिनेत्याने सांगितलं मराठी अभिनेत्रीशी ब्रेकअपचं कारण; म्हणाला...



अभिनेता जेसन शाह संजय लीला भन्साळी यांच्या ‘हीरामंडी’ या वेब सीरीजममुळे चर्चेत आला आहे. या शोमध्ये जेसनने ब्रिटिश अधिकारी कार्टराईटची भूमिका साकारली आहे. या सीरिजमधील अभिनयासाठी जेसन शाहचं खूप कौतुक होत आहे. याचदरम्यान त्याने आपल्या मराठमोळ्या एक्स गर्लफ्रेंडशी ब्रेकअप का झालं याचा खुलासा केला आहे. जेसन व्हीजे व अभिनेत्री अनुषा दांडेकरसोबत रिलेशनशिपमध्ये होता. आता एका मुलाखतीत जेसनने ब्रेकअपची काही कारणं सांगितली आहेत. अनुषासोबत ब्रेकअप झाल्यामुळे आपल्यात मोठा आध्यात्मिक बदल झाला आहे, असं जेसनने सांगितलं. ब्रेकअप कशामुळे झालं याबद्दल तो म्हणाला की तिच्याबरोबर रिलेशनशिपमध्ये येण्यास त्याच्याकडून घाई झाली आणि अनुषा त्याला खरोखर समजू शकली नाही. “समोरची व्यक्ती (अनुषा) मला खरोखरच समजून घेऊ शकली नाही आणि मला वाटलं की ती मला तिच्या एका ठराविक बॉक्समध्ये फिट करण्याचा प्रयत्न करत होती. पण तसं होऊ शकत नाही ना?” असं जेसन म्हणाला.

# सैफच्या पहिल्या बायकोशी शर्मिला टागोर यांचं कसं आहे नातं?



सैफ अली खान व अमृता सिंह यांचा घटस्फोट झाल्यावर त्यांची मुलं सारा व इब्राहिम यांचा सांभाळ अभिनेत्रीने एकटीने केला. सारा व इब्राहिम आईबरोबरच राहतात. साराचे आई-वडील विभक्त झाले असले तरी ती आजी शर्मिला टागोर यांच्या खूप जवळ आहे. सारा अनेकदा आजीबद्दल बोलत असते. दिल्लीत नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात साराने तिचे आई-वडील अमृता सिंह आणि सैफ अली खान यांच्या घटस्फोटाच्या जवळपास २० वर्षांनीही शर्मिला त्यांना आयुष्यात कशाप्रकारे साथ देत आहेत याबद्दल खुलासा केला.

‘टाईम्स ऑफ इंडिया’च्या वृत्तानुसार, सारा म्हणाली की तिचे आई आणि वडील एकत्र राहत नसले तरी शर्मिला यांचं अमृताबरोबर खूप चांगलं इक्वेशन आहे. “माझ्या आईला आई-वडील नाहीत, पण मला किंवा इब्राहिमला काही झालं तर मला माहीत आहे की ती एकटी नसेल, कारण बडी अम्मा (शर्मिला टागोर) तिथे असतील आणि तेच आमच्यासाठी सर्व काही आहे,” असं साराने नमूद केलं. आयुष्यात यश मिळालं की खूप लोक कौतुक करणारे असतात, पण जेव्हा आधाराची गरज होती तेव्हा आजी शर्मिला धावून आल्या, असं साराने सांगितलं. “मी आयुष्यात एका अशा टप्प्यातून गेले, जेव्हा मला आधाराची खूप गरज होती आणि तिथे बडी अम्मा माझ्यासाठी धावून आल्या.

त्या माझ्यासाठी उपलब्ध होत्या, अशा वेळीच तुम्हाला नातेसंबंधांची खरी किंमत कळते,” असं सारा म्हणाली.

## दिनविशेष

### घटना

२०२२ : भारतीय नौदल - भारतीय बनावटीच्या दोन आघाडीच्या युद्धनौका - INS सुरत आणि INS उदयगिरी यांचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हातून बलोकार्पण.

२००४: अमेरिकेतील पहिला कायदेशीर समलिंगी विवाह झाला.

१९९५ : जॅक शिराक - फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष बनले.

१९९०: समलैंगिकता - जागतिक आरोग्य संघटनेने समलैंगिकता मानसोपचार रोगांच्या यादीतून काढून टाकले.

१९८३: लेबानन देशातून सैन्य काढुन घेण्याच्या करारावर लेबानन, इस्त्रायल आणि अमेरिकेने सह्या केल्या.

१९६४ : टिम हॉर्टन्स इंक. - कंपनीची सुरवात.

### जन्म

१९६६: कुसय हुसेन - सद्दाम हुसेन यांचा मुलगा (निधन : २२ जुलै २००३)

१९५०: जेनेझ ड्रनोव्हसेक - स्लोव्हेनिया देशाचे २रे अध्यक्ष (निधन: २३ फेब्रुवारी २००८)

१९४५ : बी. एस. चंद्रशेखर भारतीय क्रिकेटपटू - पद्मश्री

१८९७: ऑड हॅसल - नॉर्वेजियन रसायनशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक - नोबेल पारितोषिक (निधन : ११ मे १९८१)

१८६८ : होरेस डॉज - डॉज मोटर कंपनीचे एक संस्थापक (निधन: १० डिसेंबर १९२०)

### निधन

२०२२: शेरिन सेलिन मॅथ्यू - भारतीय ट्रान्सजेंडर मॉडेल

२०१४: सी. पी. कृष्णन नायर द लीला पॅलेस, हॉटेल्स अँड रिसॉर्ट्सचे संस्थापक - पद्म भूषण (जन्म: ९ फेब्रुवारी १९२२)

२०१४: जेराल्ड एडेलमन - अमेरिकन जीवशास्त्रज्ञ आणि रोगप्रतिकारकशास्त्रज्ञ - नोबेल पारितोषिक (जन्म: १ जुलै १९२९)

२०१२ : डोना समर - अमेरिकन गायिका (जन्म: ३१ डिसेंबर १९४८)

२००७ : टी. के. दोराईस्वामी - भारतीय कवी आणि लेखक (जन्म: २१ ऑगस्ट १९२१)

१९९६: रुसी शेरियर मोदी - कसोटीपटू (जन्म: ११ नोव्हेंबर १९२४)

१९८७: गुन्नार मायर्डल - स्वीडिश अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि राजकारणी - नोबेल पारितोषिक (जन्म: ६ डिसेंबर १८९८)

१९७२: रघुनाथ कृष्ण फडके - शिल्पकार

१९५१ : विल्यम बर्डवुड - भारतीय इंग्रजी फील्डमार्शल (जन्म: १३ सप्टेंबर १८६५)

१८८६ : जॉन डीयर - डीयर एंड कंपनीची स्थापक (जन्म: ७ फेब्रुवारी १८०४)

१८३८ : चार्ल्स मॉरिस डी टॅलीरॅंड फ्रान्सचे पंतप्रधान (जन्म: २ फेब्रुवारी १७५४)

## राशि भविष्य

**मेष** — योगासने आणि ध्यानधारणा यामुळे तुमच्या शरीराला आकार मिळेल आणि मानसिकदृष्ट्या तुम्ही सक्षम राहाल. आजच्या दिवशी तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे परंतु, या सोबतच तुम्ही दान-पुण्य ही केले पाहिजे कारण यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल.

**सिंह** — तुमचा दुर्दम्य आत्मविश्वास आणि कामाची सुटसुटीत वेळ यामुळे आज दिवसभरात विश्रांती घेण्यास वेळ मिळेल. कुटुंबातील कुणी सदस्यांच्या आजारी पडण्यामुळे तुम्हाला आर्थिक चिंता येऊ शकते. तथापि, यावेळी तुम्हाला धन पेक्षा जास्त त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे.

**धनु** — मौजमजा करण्यासाठी बाहेरगावी जाऊन आनंद लुटाल, मजा कराल. आपले धन संचय करण्यासाठी आज आपल्या घरातील लोकांसोबत तुम्हाला बोलण्याची आवश्यकता आहे. त्यांचा सल्ला तुमची आर्थिक स्थिती सुधारण्यात मदत करेल. इतरांच्या सूचनांप्रमाणे काम करणे महत्त्वाचे असणारा दिवस.

**वृषभ** — योगासने आणि ध्यानधारणा यामुळे तुमच्या शरीराला आकार मिळेल आणि मानसिकदृष्ट्या तुम्ही सक्षम राहाल. नवीन करार लाभदायक वाटण्याची शक्यता आहे, पण तुमच्या अपेक्षेप्रमाणे लाभ होण्याची शक्यता कमी आहे. पैसे गुंतवताना घाईगडबडीने कोणताही निर्णय घेऊ नका.

**कन्या** — खूपच चिंता केल्याने तुमची मानसिक शांतात भंग पावेल. कारण चिंता केल्यामुळे प्रकृती बिघडते. आज तुम्हाला पैश्याने जोडलेली काही समस्या येऊ शकते ज्याला सुरळीत करण्यासाठी तुम्ही आपल्या पिता किंवा पितातुल्य कुणी माणसाकडून सल्ला घेऊ शकतात.

**मकर** — सुखी आयुष्यासाठी, वेळेचा निव्वळ व्यय करणा-या हट्टी स्वभावाचा त्याग करा. जर तुम्ही विवाहित आहेत तर आपल्या मुलांची विशेष काळजी घ्या कारण, जर तुम्ही असे केले नाही तर, त्यांची तब्बेत बिघडू शकते आणि तुम्हाला त्यांच्या स्वास्थ्यावर बराच पैसा खर्च करावा लागू शकतो.

**मिथुन** — आयुष्याबद्दल उदार दृष्टीकोन तयार करा. आपल्या परिस्थितीबद्दल जगण्याबद्दल तक्रारी करून उदास होण्यात काहीही अर्थ नाही. अशा प्रकारचे लाचार निराश विचार, जगण्यातील मजा आणि आयुष्याकडूनच्या आशा अपेक्षा उद्ध्वस्त करून टाकतात. दीर्घकाळ प्रलंबित असणारी थकबाकी आणि येणे अंतिमत: प्राप्त होईल.

**तूळ** — अलिकडे घडलेल्या घटनांमुळे तुमचे चित्त विचलित होईल. ध्यानधारणा आणि योगासने यामुळे तुम्हाला शारीरिक व अध्यात्मिक फायदा होईल. तात्पुरते कर्ज मागण्यासाठी आलेल्या लोकांकडे निव्वळ दुर्लक्ष करा. संध्याकाळी अचानक पाहुणे आल्याने घरात गर्दी होईल.

**कुंभ** — भावनांवर नियंत्रण ठेवणे कठीण होऊन बसेल - तुमचे अनपेक्षित वागणे तुमच्या अवतीभवतीच्या लोकांना गोंधळात टाकेल आणि तुम्हीसुद्धा निराश व्हाल. आज तुम्ही घरातून बाहेर खूप सकारात्मकतेने निघाल परंतु, कुठल्या किमती वस्तूची चोरी होण्याने तुमचा मूड खराब होऊ शकतो.

**कर्क** — प्रदीर्घ आजारातून तुम्ही बरे व्हाल. जर आज तुम्ही आपल्या मित्रांसोबत कुठे फिरायला जाण्याचा प्लॅन करत असाल तर, विचार पूर्वक धन खर्च करा. धन हानी होऊ शकते. घरात काही घडल्याने तुम्ही खूप भावनिक व्हाल - परंतु, तुमच्या भावना संबंधित व्यक्तीपर्यंत परिणामकारकरित्या पोहोचविण्यात तुम्ही यशस्वी व्हाल.

**वृश्चिक** — आरामात राहण्याचा आनंद आज लुटू शकाल. आज तुमचे भाऊ बहीण तुमच्याकडून आर्थिक मदत माघू शकतात आणि त्यांच्या मदतीने तुम्ही स्वतः आर्थिक दबावात येऊ शकतात तथापि, स्थिती लवकरच सुधारेल. आपल्या मित्रमैत्रिणींबरोबर काहीतरी मस्तीखोर, उत्साही करण्यासाठी एकदम योग्य दिवस.

**मीन** — तुमच्या निराशावादी दृष्टिकोनामुळे तुम्ही कोणतीही प्रगती करू शकणार नाही. चिंता करण्याच्या प्रवृत्तीमुळे तुमची विचारशक्ती मंदावली आहे हे ओळखण्याची हीच खरी वेळ आहे. उजळ बाजूकडे पाहा आणि त्यामुळे तुमच्या निर्णयात बदल कराल. व्यापारात आज चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे.

# "शिवसेना आणि ठाकरेंमुळेच आज मोदीजी रस्त्यावर"

## मुंबईतील रोडशोवरून संजय राऊतांची खोचक टीका !

● मुंबई - महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आज मुंबईत पंतप्रधान मोदी यांचा रोड शो आयोजित करण्यात आला होता. या रोडशोद्वारे एकप्रकारे शक्तीप्रदर्शन करण्याचा भाजपाकडून करण्यात आला. दरम्यान, या रोड शोनंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. यावरूनच ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनीही पंतप्रधान मोदी यांच्यावर खोचक शब्दांत टीका केली आहे. ठाकरेंची साथ सोडल्यामुळेच पंतप्रधान मोदी रस्त्यावर आले, असे ते म्हणाले. नाशिकमधील प्रचारसभेत बोलताना त्यांनी ही टीका केली.



"मुंबईमध्ये पंतप्रधान मोदी यांचा रोडशो झाला. त्यासाठी संपूर्ण मुंबई बंद करण्यात आली होती. रेल्वे आणि मेट्रोदेखील बंद करण्यात आल्या. गेल्या एक महिन्यात मोदींनी महाराष्ट्रात २८ सभा घेतल्या, याशिवाय आज त्यांचा रोड शोदेखील झाला. खरं तर शिवसेना आणि ठाकरेंची साथ सोडल्यामुळेच मोदींना रस्त्यावर यावं लागले आहे. मोदींनी कितीही सभा घेतल्या तरी हा महाराष्ट्र मोदींच्या पाठिशी उभा राहणार नाही", अशी खोचक टीका संजय राऊत यांनी केली. "महाराष्ट्रात जिथेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा झाली आहे, तिथे भाजपाच्या उमेदवारांचा पराभव होणार आहे. त्या प्रत्येक ठिकाणी महाविकास आघाडीचा उमेदवार विजयी होईल, हे मी खात्रीने सांगू शकतो. कारण मोदींनी कर्नाटकमध्येही २७ सभा घेतल्या होत्या. त्या निवडणुकीत भाजपाच्या १४ मंत्र्यांचा पराभव झाला होता. त्यामुळे मोदी आले म्हणून भाजपाला विजय मिळेल", असं होणार नाही. असेही ते म्हणाले.

"आज नाशिकमध्ये पंतप्रधान मोदी यांची सभा झाली. या सभेत एका शेतकऱ्याने त्यांना कांद्याच्या प्रश्नावर बोलण्याची विनंती केली, त्यावेळी पंतप्रधान मोदी यांनी त्या शेतकऱ्याकडे रागाने बघितले आणि भारत माता की जय अशी घोषणा देत निघून गेले. भारत माता ही काय भाजपाची खासगी संपत्ती आहे का? ज्या शेतकऱ्याकडे त्यांनी रागाने बघितले तोदेखील भारत मातेचे पुत्र होता. जर पंतप्रधान मोदी नाशिकमध्ये येऊन कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवू शकत नसतील आणि केवळ थापा मारून निघून जात असतील, तर अशा थापाड्याची या देशाला गरज नाही", अशी टीकाही संजय राऊत यांनी केली.

# अमरावती शहरात बनावट नोटांचा सुळसुळाट

● अमरावती : शहरातील बाजारपेठेत पाचशे रुपयांच्या बनावट नोटा मोठ्या प्रमाणात आल्याने व्यापारी आणि ग्राहकांच्या अडचणीत वाढ झाली आहे.गेल्या पंधरा दिवसांत पाचशेच्या तब्बल २८ बनावट नोटा चलनात आल्याचे निदर्शनास आले आहे.येथील जयस्तंभ चौक परिसरातील एका बँकेत ५०० रुपयांच्या ८ बनावट नोटा आढळल्या. या प्रकरणी बँक कर्मचारी श्रीकांत काळे (२१) रा. चांदूरबाजार यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला.



मंगळवारी दुपारी एक ग्राहक ५ लाखांची रक्कम जमा करण्यासाठी जयस्तंभ चौक परिसरातील बँकेत गेला.त्याने सदर रक्कम ही श्रीकांत काळे यांना दिली. त्या रकमेमध्ये ८०० नोटा या ५०० रुपयांच्या होत्या. श्रीकांत काळे हे ती रक्कम मोजत असताना त्यांना त्यातील ८ नोटा बनावट असल्याचा संशय आला. त्यामुळे श्रीकांत काळे यांनी त्या नोटांची पुन्हा पडताळणी केली. मात्र, त्यातून त्या बनावटच असल्याचे आढळून आले. त्यामुळे श्रीकांत काळे यांनी याबाबत आपल्या वरिष्ठांना माहिती देऊन सायंकाळी कोतवाली ठाण्यात तक्रार दाखल केली. आपल्या बँकेचे ग्राहक रश्मी ट्रेडर्स यांना कुणीतरी अज्ञात ग्राहकाने ५०० रुपयांच्या ८ बनावट नोटा दिल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अकरा दिवसांपूर्वी एका बँकेच्या सराफा बाजार येथील शाखेतसुद्धा ५०० रुपयांच्या २० बनावट नोटा आढळून आल्या होत्या. १६ एप्रिल रोजी वेगवेगळ्या तीन खातेदारांनी भरलेल्या रकमेत त्या बनावट नोटा आढळल्याची तक्रार खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात करण्यात आली होती.

# अपहरण करून एक कोटीच्या खंडणीचा डाव फसला, अकोल्यातील अपहृत व्यावसायिक सुखरुप परतले




●अकोला: शहरातील रायलीजीन भागातून व्यावसायिक अरुण वोरा यांचे अपहरण केल्यानंतर एक कोटी रुपयांची खंडणी मागण्याचा अपहरणकर्त्यांचा डाव फसला आहे. दोन दिवसानंतर व्यावसायिक बुधवारी मध्यरात्री घरी सुखरूप परतले. या प्रकरणी पोलिसांनी तपासाला वेग देऊन पाच आरोपींना गजाआड केले. आरोपींकडून शस्त्रांसह मुद्देमाल देखील जप्त करण्यात आला आहे. शहरातील दगडीपूल परिसरात अरुण वोरा यांचे रिकाम्या काच बॉटलचे दुकान आहे. सोमवारी रात्री काम आटोपून ते घरी जाण्यासाठी निघाले असता तीन ते चार जणांनी शस्त्राचा धाक दाखवून त्यांना चारचाकी गाडीत डांबले. पांढऱ्या रंगाच्या गाडीतून भरधाव वेगात अपहरणकर्ते व्यावसायिकाला घेऊन पसार झाले. या प्रकरणी रामदासपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून तपास करण्यात आला. व्यावसायिकाचा शोध घेण्यासाठी पथके विविध भागात रवाना करण्यात आली होती. दोन दिवसांपासून व्यावसायिकाचा शोध न लागल्याने माहिती देणाऱ्यासाठी २५ हजार रुपयांचे बक्षीस देखील जाहीर करण्यात आले. दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेला देखील तपासाचे आदेश दिल्यावर दोन पथके गठित करण्यात आले. आरोपी मिथुन सुधाकर इंगळे रा.चिवचिव बाजार, अकोला, किशोर पुंजाजी दाभाडे, शरद पुंजाजी दाभाडे, दोन्ही रा. ग्राम कळंबेश्वर, फिरोज खान युसूफ खान रा.अकोला, अशिष अरविंद घनबाहादुर रा. बोरगाव मंजू, राजा सरफराज खान रा. कान्हेरी सरप, चंदु इंगळे रा.खदान व अन्य एक अशा आठ जणांनी अरुण वोरा यांचे अपहरण केल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. दरम्यान, अपहृत अरुण वोरा बुधवारी मध्यरात्री घरी परतले. त्यांची विचापूस केली असता कान्हेरी सरप येथे एका घरात त्यांना कोंडून ठेवल्याचे समोर आले.


# निवडणुकीच्या धामधुमीत २६७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या



● छत्रपती संभाजीनगर : लोकसभा निवडणुकीच्या काळात मराठवाड्यात एप्रिलमध्ये २६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. बुधवारी दत्ता काशिनाथ महिपाल-पाटील या २५ वर्षीय शेतकरी तरुणाने आत्महत्या केली. त्याने माजलगाव येथील गोपाळा बँकेकडून एक लाखांचे कर्ज घेतले होते. एका बाजूला आत्महत्यांचा आकडा वाढत असतानाच मराठवाड्यातील पाणीपातळी घसरली असून टँकरची संख्या १७५८ एवढी झाली आहे. बीड जिल्ह्यात जेव्हा जातीय प्रचाराने टोक गाठले होते तेव्हा (एप्रिल महिन्यात) सर्वाधिक ५९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. या जिल्ह्यात सध्या तीव्र पाणीटंचाई आहे. प्रचार काळात कृषी मालाच्या पडलेल्या भावाचा मुद्दाही चर्चेत आला होता. अनेक भागांत शेतकऱ्यांनी उमेदवारांना घसरलेल्या भावावरून प्रश्न विचारले. दीड वर्षापूर्वी तत्कालीन विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनी शेतकरी आत्महत्यांच्या अनुषंगाने तयार केलेल्या अहवालानुसार २०१२ ते २०२२ पर्यंत ८,७१९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली होती. माजलगाव तालुक्यातील शिंदेवाडी येथील दत्ता कालिदास महिपाल याने आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत 'बँकेकडून तगादा सुरू असल्याने त्रस्त आहे. मोठे कर्ज घेणारे परदेशी पळून जातात आणि छोट्या कर्जदारांना बँक त्रास देते,'' असे म्हटले आहे.

# उद्योगासह दरडोई उत्पन्नवाढ मंदावली

● कोल्हापूर : उत्पन्नाच्या अनेक बाबी उपलब्ध असतानाही कोल्हापूरचे दरडोई उत्पन्न अपेक्षित गतीने वाढत नाही. उद्यमशीलतेचा वारसा आता कागदावर राहिला असून उद्योगाचे चक्र गतिमान होण्याऐवजी मंदगतीचा ठपका लागतो आहे. उसाचे नगदी पीक सोबतीला दूध व्यवसायातून येणारा पैसा, चौफेर पर्यटनाची चांगली संधी, नानाविध उद्योगांचीही मालिका असे अर्थकारणाला गती देणारे पूरक वातावरण कोल्हापुरात आधीपासूनच असूनही कोल्हापूरची विकासगती पुढे जात नाही. दरडोई उत्पन्नाचा आलेख उंचावत नाही. २०२१-२०२२च्या आकडेवारीनुसार जिल्ह्यातील सरासरी दरडोई उत्पन्न २ लाख ८ हजार रुपये इतके आहे. ते राज्याच्या दरडोई उत्पन्नापेक्षा (२ लाख १५ हजार रुपये) पेक्षा कमी आहे. नेमके स्थान मोजायचे तर राज्यात दरडोई उत्पन्नात कोल्हापूर सातव्या स्थानी आहे. तसे पहिले तर गेल्या दहा वर्षांमध्ये कोल्हापूरचे दरडोई उत्पन्न




जवळपास एक लाख रुपयांनी वाढले आहे. म्हणजे, सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात कोल्हापूरचे आर्थिक उत्पन्न १ लाख ४ हजार रुपये होते. अर्थात तेव्हाही मुंबई, ठाणे, पुणे, रायगड या जिल्ह्यांनंतर कोल्हापूरचा क्रम राहिला होता.

महालक्ष्मी, जोतिबासारखी महत्त्वाची देवस्थाने, पर्यटनाचे अनेक आकर्षक पर्याय, फौंड्री, इंजिनीअरिंग, वस्त्रोद्योग, सोने -चांदी व्यवसाय, बारमाही फुलणारी नगदी पिकांची शेती, विकसित विमानतळ अशा भक्कम बाबी असतानाही कोल्हापूरच्या प्रगतीचे घोडे पेंड खात आहे. विकासाचे आराखडे उत्साहाने तयार होतात आणि यथावकाश रेंगाळतात, हा पूर्वानुभव निरुत्साही करणारा. सूक्ष्म, लघु व मध्य उद्योग यावर जिल्ह्याच्या उद्योगाचा गाडा मुख्यत्वेकरून उभा. असे सुमारे ६५ हजार उद्योग आणि त्यातून साडेपाच लाख रोजगारनिर्मिती. जोडीला साखर कारखाने, दूध संघ, सूतगिरण्या, बँका असे सहकार समृद्ध करणारे उद्योग. काहींना उद्योग विस्तारायचा आहे. वानवा आहे ती जागा टंचाईची. एखादा बडा उद्योग कोल्हापूरमध्ये यावा ही उद्योजकांची गेल्या अनेक वर्षांपासूनची अपेक्षा. त्याबाबतीत ठोस असे काहीच घडत नाही.

# 'Did not make any exception': SC refuses to consider ED objection to Arvind Kejriwal's campaign speech



● NEW DELHI: The Supreme Court on Thursday refused to consider the Enforcement Directorate's objection against Arvind Kejriwal's statement during a poll rally, in which the Delhi chief minister said that if people vote for AAP, he will not have to go back to jail on June 2.

A bench of Justices Sanjiv Khanna and Dipankar Datta said that they had not granted any special treatment to Kejriwal in providing him interim bail for campaigning in the Lok Sabha elections.

"We have not made any exception for anybody, we said in our order what we felt was justified," the bench said, adding that critical analysis of the judgment is "welcome".

The apex court was hearing Kejriwal's petition challenging his ED arrest.

Last week, addressing a poll rally in Uttam Nagar, Kejriwal said that if people vote for him, then he would not have to go to jail again.

He said: "These people (BJP) are telling me that I have to go back to jail after 20 days. If you people press the button enough on the broom (AAP election symbol), then I will not need to go to jail. There is power in your hands."

On May 10, the Supreme Court had granted interim bail to Kejriwal in a money laundering case related to the alleged Delhi excise policy scam. The court directed him to surrender on June 2. Kejriwal was arrested on March 21.

# शाळेजवळ दारु दुकान सुरु करण्यासाठी शिक्षण अधिकाऱ्याकडून लाच

● नंदुरबार : शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातही लाचखोरीची कीड लागल्याने हे क्षेत्रही आता लाचखोरीने ग्रस्त झाल्याचे वारंवार सिद्ध होत आहे. नंदुरबार जिल्ह्यातही असाच प्रकार घडल्याने संताप व्यक्त होत आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर शहरात एका व्यक्तीला दारु दुकान सुरु करायचे होते. परंतु, ज्या ठिकाणी त्याला दारु दुकान सुरु करायचे होते, त्या जागेजवळ ७५ मीटरच्या आत जिल्हा परिषदेची शाळा असल्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाने त्यास परवानगी नाकारली होती. सदरची शाळा जीर्ण होवून बंद असल्याने तसे शिक्षण अधिकारी यांच्याकडून प्रमाणपत्र आणण्याचे त्यास सांगण्यात आले



होते. यासाठी संबंधिताने नंदुरबार जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षण अधिकारी सतीश चौधरी यांच्याकडे धाव घेतली. चौधरी यांनी संबंधितांची अडचण ओळखून तसेच एका संस्थेस आरटीई मान्यता वर्धीत असल्याचे काम करुन देण्याबद्दल ५० हजार रुपयांची मागणी केली.


संबंधिताने याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. विभागाच्या पथकाने शिक्षण अधिकाऱ्यास जाळयात अडकविण्यासाठी सापळा रचला. नंदुरबार जिल्हा परिषदेच्या मुख्यालयातच लाच स्वीकारतांना नाशिक लाचलुचपत प्रतिबंधकच्या पथकाने शिक्षण अधिकारी चौधरी यास रंगेहात ताब्यात घेतले.

शिक्षणासारख्या पवित्र कामातही जिल्ह्यातील सर्वोच्च पद असलेल्या शिक्षण अधिकाऱ्यानेच थेट शाळांशेजारी दारु दुकान सुरु करण्यासाठी मांडलेला खेळ यातून समोर येत आहे. गेल्या महिन्याभरातला हा तिसरा मोठा सापळा असून यामुळे नंदुरबारमधल्या लाचखोरांचे धाबे दणाणले आहे.

# 8 years ago, author Amitav Ghosh predicted how Mumbai hoardings will turn out to be 'deadly'

● MUMBAI: Eight years ago, author Amitav Ghosh had warned that Mumbai's big billboards could become dangerous during a cyclone.

Ghosh, who has consistently emphasized the problems related to climate change in his writings, highlighted the potential dangers faced by Mumbai's inhabitants in his book 'The Great Derangement: Climate Change and the Unthinkable', he pointed out the vulnerability of the city's informal



settlements, where many homes are constructed with metal sheets and corrugated iron roofs.

In the event of a cyclone, Ghosh warns these roofing materials along with the numerous billboards that adorn the city, would be transformed into lethal projectiles.

The powerful winds would hurl these objects with immense force, posing a significant threat to the glass-covered high-rise buildings that dominate Mumbai's skyline.

Reacting to the post a user wrote : "Yes sir, very true. While watching the storm unfolding yesterday, I remembered you and your books. The climate crisis is really at our doorstep and we are in complete denial mode (Sic)."

"Mumbai has the most unaesthetically placed billboards in the world. They are so randomly placed and in so many numbers that it mars the beauty of the city and its skyline" another user wrote.

# 'Remove 45 billboards from CR, WR premises'




● MUMBAI: The Brihanmumbai Municipal Corporation (BMC) has issued a notice to railway authorities, requesting that a structural audit of all 205 hoardings on land belonging to the Central and Western Railway be conducted. The notice also seeks the removal of 45 billboards on railway premises that exceed the approved size. Meanwhile, the civic body has started acting against illegal billboards across the city.

"We have issued a notice to the railway authorities to conduct a billboard audit. We have also asked the authorities to remove 45 billboards which are larger than the approved size," said Additional Municipal Commissioner Ashwini Joshi.

The BMC's licensing department had identified 250 billboards on railway property. Of these, 45 flout the size regulation. It has now sought a structural audit for billboards that are facing municipal property and roads. An official said, "Civic chief Bhushan Gagrani ordered ward offices to start auditing all billboards in the city. The survey will be completed soon. After that, immediate action will be taken." Meanwhile, the civic body has started removing illegal billboards at Malad West.

"There was an illegal hoarding over a sweet shop opposite Malad railway station. We have gotten rid of it," said the official. The BMC has also started removing billboards located at the Ghatkopar railway police quarters opposite the petrol pump where Monday's accident happened. "These hoardings are huge. It will take more days to remove them," the official added.



# वळीवाच्या पावसाने जव्हारवासियांची दाणादाण, घरांसह जि.प शाळांचीही छपरे उडाली, फळबागांचे नुकसान

● जव्हार, प्रतिनिधी :

सोमवारी तालुक्यात वादळीवाऱ्यासह झालेल्या वळीवाच्या पावसाने येथील नागरिकांचे नुकसान झाले. याचे पंचनामे करण्याची मागणी होत असतानाच बुधवारी सायंकाळी पुन्हा या पावसाने जव्हार तालुक्याला झोडपले. बुधवारी झालेल्या पावसामुळे येथील जनजीवनाची दाणादाण उडालेली पाहायला मिळाली. जव्हार तालुक्यात जवळपास ५०० हून अधिक घरांची छपरे उडून गेल्याने संसार उघड्यावर पडलेत. जि.प. शाळांवरील छप्परे उडून आतील साहित्याचे नुकसान झाले. तर अनेक झाडे उन्मळून पडल्याने फळबागायतदार, शेतकरी संकटात सापडले आहेत.

सोमवारी अन्य तालुक्यांप्रमाणे जव्हारमध्येही जोरदार वारा-पाऊस झाला. त्यातील नुकसानीचे योग्य माहिती घेऊन पंचनामे करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. तर तालुक्यात बुधवारी सायंकाळी पुन्हा वळीवाचा पाऊस झाला. येथील वाळवंडा, वरचा कशीवली येथील जवळपास सर्वच घरांचे पत्रे उडून गावातील अनेक संसार उघड्यावर पडले आहेत. तर अनेक मोठमोठी झाडे उन्मळून पडल्याने अनेक मार्ग बंद पडले होते. तर काही झाडं घरावर पडलीत. त्याचबरोबर तालुक्यातील काही जिल्हा परिषद शाळांचीही छप्परं उडून शाळेतील साहित्याचे नुकसान झाले आहे.

तालुक्यातील वाळवंडा, कशिवली, खडकीपाडा, साखरे, शिरोशी, धानोशी, रामखिंड, विनवळ, जामसर, न्याहाळे, पाथर्डी, झाप, आपटाळे, या गावांमध्ये बुधवारच्या पावसाने मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाकडून पंचनामे करण्याचे काम सुरू आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या जास्त असल्याने पंचनामे करण्यासाठी किमान तीन ते चार दिवस लागणार असल्याची माहिती महसूल विभागाकडून मिळाली.

# नेपाळी रखवालदारांबाबत कडक पावले

## कामावर ठेवणाऱ्या मालकाने पोलिस ठाण्यात नोंदणी न केल्यास गुन्हा दाखल होणार

●रत्नागिरी, प्रतिनिधी :

तालुक्यातील पावस नजीकच्या गोळप येथील नेपाळयांच्या दुहेरी हत्याकांडानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी नेपाळी रखवालदारांबाबत कडक पावले उचलली आहेत. या गुरख्यांना कामावर ठेवणाऱ्या मालकांनी त्यांची नोंदणी संबंधित पोलिस ठाण्यात न केल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल होणार आहेत.

त्यामुळे आता या गुरख्यांना कामावर ठेवणाऱ्या मालकांनाही जातीने या गुरख्यांची नोंदणी करावी लागणार आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात आंबा बागायतींच्या रखवालीसाठी तसेच मच्छिमारी नौकेवर खलाशी म्हणून सुमारे १५,००० ते २०,००० इतके नेपाळी जिल्ह्यात वास्तव्याला आहेत. मात्र, पोलिसांकडे केवळ ४२०० जणांचीच नोंदणी झालेली आहे. आंबा बागायतींमध्ये असणारे रखवालदार आंबा हंगाम संपला की परत त्यांच्या मूळ गावी जातात. या नेपाळी व्यक्तींकडे त्यांच्या देशाचे आधारकार्ड



असते. देशात किंवा कोकणात कामाला ठेवल्यानंतर त्यांची माहिती मालकाने पोलिस ठाण्यात सादर करणे यापुर्वीही बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, या नेपाळयांना रखवालदार म्हणून चार - पाच महिने कामावर ठेवून घेतले जाते. हंगाम संपला की त्यांना कामावरून कमी केले जाते. त्यामुळे बरेचदा ते आपल्या गावाला परत जातात.

गेल्या वीस वर्षात रत्नागिरी जिल्ह्यात अशा नेपाळी रखवालदारांकडून गुन्ह्याचे प्रमाण वाढत आहे. परप्रांतीय खलाशी, बागेतील कामगार यांच्यामध्ये वाद होतात, खून होतात. तपास करताना लक्षात येते की पोलिसांकडे अशा अनेक कामगारांची नोंद नाही. त्यामुळे अशा गुन्ह्यांच्या तपासात अनेक अडचणी येतात. बरेचदा असे रखवालदार गुन्हे करून त्यांच्या गावाला गेल्यानंतर त्या घटनेचा तपास होऊ शकत नाही. बरेचदा एका नेपाळयाकडून दुसऱ्या नेपाळयाला कामाला ठेवले जाते. आंबा बागायती या एका बाजुला असल्याने नेपाळी रखवालदारांमध्ये आपापसात हाणामारी होऊन खूनाचे प्रकार घडतात. मात्र, काही वेळा त्यांच्या मालकांनाच त्यांच्या रखवालदाराबाबत माहिती नसल्याने पोलिसांसमोर अडचणी येतात.

रत्नागिरीत असे प्रकार वाढल्याने जिल्हा पोलिस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी याप्रकरणी कडक पावले उचलली आहेत. जिल्ह्यात आंबा, मासेमारीसाठी येणाऱ्या नेपाळी व्यक्तींची त्यांना कामावर ठेवणाऱ्या मालकांनी पोलीस स्थानकात नोंदणी करुन घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. नोंदणी न करणाऱ्या आंबा बागायतदार, नौका मालकांवर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

> “ नेपाळी लोकांकडे त्यांच्या देशाने दिलेले आधारकार्ड असते. रत्नागिरी जिल्ह्यात कामाला असलेल्या नेपाळी लोकांकडून अनेक गुन्हे घडले आहेत. मात्र, त्याची माहिती पोलिस ठाण्यात दिलेली नसल्याने अनेकदा तपास होऊ शकत नाही. त्यामुळे हे वाढते गुन्हे लक्षात घेऊन त्याच्यावर आळा बसण्यासाठी त्यांच्या मालकांनी कामावर ठेवताना त्यांची माहिती जवळच्या पोलिस ठाण्यात द्यावी. न दिल्यास मालकांवरच गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.
>
> - धनंजय कुलकर्णी, जिल्हा पोलिस अधीक्षक, रत्नागिरी

## नवी मुंबईत मतदार याद्यांमध्ये घोळ

# अनेकांची नावे गायब, एकाच नंबरवर दोघांची नावे

● नवी मुंबई, प्रतिनिधी :

मतदान चार दिवसांवर आले असतानाही मतदार याद्यांमधील घोळ अद्याप संपलेला नाही. अनेक मतदारांची नावे यादीतून गायब झाली आहेत. एकाच आयटीआर नंबरवर दोन मतदारांचे नाव असल्याचेही निदर्शनास आले असून या गोंधळामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

ठाणे लोकसभा मतदारसंघामध्ये नवी मुंबईमधील ऐरोली विधानसभा क्षेत्रात ४ लाख ३९ हजार व बेलापूर मतदारसंघात ३ लाख ७९ हजार मतदारांचा समावेश आहे. याशिवाय आचारसंहिता लागू केल्यानंतर अनेक नागरिकांनी ऑनलाइन अर्ज भरला आहे. परंतु, यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये मतदान केलेल्या अनेकांची नावे मतदार यादीमधून गायब झाली आहेत. काही तरुणांनी ऑनलाइन अर्ज भरला. परंतु, त्यांचे नावच यादीमध्ये आलेले नाही. बेलापूर मतदारसंघामध्ये राहणाऱ्या रेवती बंगेरा यांचे मतदार यादीमध्ये नाव होते. त्यांनी २०१९ च्या निवडणुकीमध्ये मतदानही केले आहे. परंतु, २०२४ च्या मतदार यादीमधून त्यांचे नाव गायब झाले आहे. मतदारयादीमध्ये नाव नसल्यामुळे त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. बेलापूर परिसरातील दीपक साठे यांचा आयटीआर नंबर ४००३७२९ असा आहे. या नंबरचे निवडणूक ओळखपत्रही त्यांच्याकडे आहे. परंतु, लोकसभा निवडणुकीसाठी हा आयटीआर नंबर सरीला तानवडे यांच्या नावावर दाखविला जात आहे.

घणसोली परिसरामध्येही अनेक मतदारांची नावे यादीतून गायब झाली आहेत. राजश्री जाधव व त्यांच्या कुटुंबीयांची नावे मतदारयादीमध्ये आलेली नाहीत. मोहित जाधव या तरुणाने ऑनलाइन अर्ज भरला होता. अर्ज भरल्याविषयी संदेशही प्राप्त झाला होता. पण प्रत्यक्षात मतदारयादीमध्ये त्याच्या नावाचा समावेश झालेला नाही. ऐरोली व बेलापूर विधानसभा क्षेत्रामध्ये अनेक ठिकाणी अशाप्रकारे मतदार यादीमधून अनेकांची नावे गायब झाली असून त्यांना मतदानापासून वंचित रहावे लागणार आहे.

# घाटकोपर होर्डिंग दुर्घटना ताजी असतानाच पुण्यातील मोशीतही कोसळले होर्डिंग



● पिंपरी, प्रतिनिधी :

पिंपरी - चिंचवड शहरातील काही भागात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला असून मोशी येथे लोखंडी होर्डिंग कोसळले आहे. सुदैवाने यात जीवितहानी किंवा कोणीही जखमी झालेलं नाही. रस्त्याच्या कडेला असलेलं लोखंडी होर्डिंग सुदैवानं रस्त्यावर पडलं नाही.

अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. हे होर्डिंग अधिकृत असल्याचे महापालिकेचे उपायुक्त संदीप खोत यांनी माहिती दिली.

पिंपरी- चिंचवड शहरातील मोशी येथे दुपारी साडेचारच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. या वादळी वाऱ्यात रस्त्यालगत असलेलं मोठं लोखंडी होर्डिंग कोसळले. होर्डिंगखाली पार्क केलेल्या दुचाकी आणि टेम्पोचे नुकसान झाले आहे. नुकतेच, मुंबईतील घाटकोपर येथे होर्डिंग कोसळून १६ जणांना मृत्यू झालेला आहे. या घटनेनंतर अवघ्या होर्डिंगचा विषय समोर आला आहे. पिंपरी- चिंचवड शहरातही अनधिकृत होर्डिंगचे ऑडिट करण्याचे काम सुरू आहे. दरम्यान ही घटना घडली.

# सिंधुदुर्ग जिल्ह्यात पुन्हा एकदा हत्ती हटाव मोहीम; उपवनसंरक्षकासह वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश

● सावंतवाडी, प्रतिनिधी :

सिंधुदुर्ग जिल्ह्यात हत्तीचा वाढता उपद्रव लक्षात घेता त्यावर उपाय योजना करण्यासाठी शासन पुन्हा एकदा हत्ती हटाव मोहीम राबविण्याच्या विचारात असून त्यासाठी सिंधुदुर्ग वनविभागाचे एक पथक उपवनसंरक्षक नवलकिशोर रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली कर्नाटक राज्यातील दांडेली अभयारण्यात अभ्यास करण्यासाठी पाठविण्यात आले आहे.

हे पथक गेले दोन दिवस दांडेली जंगलातील हत्तीचा अभ्यास करत आहेत.

सिंधुदुर्ग कोल्हापूर जिल्ह्यातील काहि भागात हत्तीचा मोठ्याप्रमाणात उपद्रव सुरू आहे.हे हत्ती शेती बागायतीचे नुकसान



करत आहेत त्याशिवाय माणसावर हल्ले ही करत आहेत.त्यामुळे या सर्वाचा रोष हा वनविभागावर निघत आहे. वनअधिकारी कर्मचारी ग्रामस्थांच्या या रोषाचे बळी ठरत आहेत. त्यामुळे शासनाने यावर कायमस्वरूपी उपाय योजना करण्यासाठी वेगवेगळया अभ्यास सुरू केला आहे.या हत्तीना आल्या मार्गाने कर्नाटक राज्यात पाठावायचे झाले तर काय करता येईल याचा अभ्यास सध्या सुरू आहे. तसेच हत्ती हटाव शक्य नसल्यास हत्तींना एकाच जागेवर थांबवून ठेवायचे झाले तर काय करता येईल याचाही अभ्यास सध्या सुरू आहे.

मध्यंतरी आसाम येथील काहि तज्ञ मंडळींही सिंधुदुर्ग जिल्ह्यात येऊन अभ्यास करून गेले होते.त्यानी अपला अहवाल शासनाला सादर केला आहे.त्यानंतर आता पुन्हा एकदा शासनाने दांडेली अभयारण्यात जाऊन तेथील हत्तीचा अभ्यास करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी एक अभ्यास पथक सिंधुदुर्ग जिल्ह्याचे उपवनसंरक्षक नवलकिशोर रेड्डी यांच्या मार्गदर्शना खाली दांडेली येथे पाठविण्यात आले असून या पथकात सहाय्यक वनसंरक्षक सुनिल लाड वनक्षेत्रपाल मदन क्षीरसागर यांच्यासह काहि कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.हे अभ्यास पथक गेले दोन दिवस दांडेली येथे अभ्यास करत आहे. हे पथक आपल्या अभ्यास दौऱ्याचा अहवाल शासनाला देणार असून त्यानंतर पुढील निर्णय वरिष्ठ पातळीवरून होणार आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात नऊ वर्षांपूर्वी हत्ती हटाव मोहीम राबविण्यात आली होती. ही मोहीम काही अंशी यशस्वी ही झाली होती.पण काहि कालावधीनंतर पुन्हा एकदा कर्नाटक मधून हत्ती सिंधुदुर्ग जिल्ह्यात आले होते.ते आजही कायम आहेत त्यावर उपाय योजना करण्यासाठी सिंधुदुर्ग वनविभाग प्रयत्न शील आहे.

# शासनाने जमीन दिली, पण शेतात जायला रस्ताच नाही; तहसील कार्यालयासमोर ग्रामस्थांचे लक्षवेधी उपोषण

● नेवासा, प्रतिनिधी :

नेवासा तालुक्यातील मुकिंदपुर आणि मुरमे येथील रहवासी असलेल्या लाभार्थ्यांना उस्थळ दुमाला (ता.नेवासा) येथे शासनाच्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेतर्गत विशेष समाज कल्याण विभागाकडून शासनाच्या 50 टक्के अनुदानावर जमीनी दिलेल्या आहेत.

मात्र या जमीनीची मशागत करण्यासाठी या लाभार्थ्यांना शेतीकडे जाण्यासाठी रस्ताच नसून




पाटपाण्यासाठी असलेल्या चारीचे पाणीही दुसरीकडेच अडविले जात आहे. यामुळे या लाभार्थ्यांना शासनाने जमीनी देवूनही या शेतात पिके घेता येत नाहीत. त्यामुळे नेवासा तहसिलदारांनी जमीनीच्या मशागतीसाठी त्वरीत रस्ता द्यावा, पाटचाऱ्या खुल्या करुन देण्याच्या मागणीसाठी गुरुवार (दि.16) रोजी सकाळी 11 वाजता नेवासा तहसिल कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरु केले आहे.

नेवासा तालुक्यातील उस्थळ दुमाला येथे शासनाच्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेतून अशोक योव्हाण दळवी, दत्तात्रय शांत्वन साठे, नंदू श्रीपती वाकडे, बाबासाहेब श्रीपती वाकडे, बाळासाहेब भाऊराव मोरे या लाभार्थ्यांना त्यांच्या शेजारी असलेल्या गट नंबर ३६४ मध्ये पाटपाण्यासाठी चारी आहे.

# दागिन्यांसाठी सोने आयात केले, पण खुल्या बाजारात सोने विकले, दोन ज्वेलरना डीआरआयने केली अटक



● नेवासा, प्रतिनिधी :

दागिन्यांची निर्मिती आणि निर्याती संदर्भात असलेल्या केंद्र सरकारच्या योजनेचा लाभ घेत परदेशातून ३७ किलो सोने मुंबईत आणत ते इथे नियमबाह्य पद्धतीने खुल्या बाजारात विकल्याप्रकरणी केंद्रीय महसूल गुप्तचर यंत्रणेच्या (डीआरआय) अधिकाऱ्यांनी दोन ज्वेलरना अटक केली आहे. हे दोघेही मुंबईत कार्यरत आहेत.प्राप्त माहितीनुसार, हे प्रकरण २०१५ -१६ या आर्थिक वर्षातील आहे. सोन्याच्या दागिन्यांची निर्मिती आणि निर्यात या संदर्भात केंद्र सरकारचे एक धोरण आहे. या धोरणाअंतर्गत सोने व्यापाऱ्यांना सोन्याची आयात करता येते. या सोन्याचे दागिने घडविल्यानंतर संबंधित धोरणानुसार त्याची माहिती सीमा शुल्क विभागाला द्यावी लागते. मात्र, या दोन्ही कंपन्यांनी १८ कोटी रुपये मूल्याचे ३७ किलो सोने परदेशातून आयात केले आणि त्याचे दागिने करण्याऐवजी ते देशात खुल्या बाजारात विकले.

# गायीवर बोलता महागाईवर का बोलत नाही?

## उद्धव ठाकरे यांचा मोदींना खणखणीत सवाल




● मुंबई, प्रतिनिधी :

नरेंद्र मोदी गायीबद्दल बोलतात पण ते महागाईबाबत का बोलत नाहीत. हा लोकसभेचा महत्त्वाचा मुद्दा आहे. तुमचीच भाषणं होती, भाई और बहनो मतदानाला जाताना गॅस सिलिंडरला नमस्कार करून जा. आता तुमच्या फोटोला नमस्कार करून जायचं का.

गॅस के दाम नीचे गये की उपर गये, डिझेल के दाम उपर गये की नीचे गये असं ते म्हणत होते. तेव्हा मोदीच म्हणायचे की ज्या देशाचं चलन पडतं त्या देशाची अब्रू जाते. आता जर चलन पडलं असेल तर नमस्कार कुणाला करायचा. मोदींनाच नमस्कार केला पाहिजे. बाबा बस झालं आता नको, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

दोघांचं हिंदुत्व कसं वेगळं काढू शकता तुम्ही. प्रबोधनकारांचे विचार बाळासाहेबांनी पुढे नेले. तेच मी आणि आदित्य नेत आहे. आम्हाला शेंडी जानव्याचे हिंदुत्व नकोय, देवळात घंटा बडवणारा हिंदु नकोय असं प्रबोधनकार बाळासाहेब म्हणायचे आम्ही तेच म्हणतोय. आमच्या हिंदुत्वात बदल झाला नाही. भाजपच्या वृत्तीत बदल झाल्याचं ठाकरे म्हणाले.

नरेंद्र मोदींनी दहा वर्षाच्या कामावर बोलावं. पीक विमा, हमी भाव का मिळत नाही, मोदी मणिपूरमध्ये का जात नाही, शौर्य आहे तर मणिपूरमध्ये शेपट्या का घातल्या आहेत. चीनने जमीन बळकावली आहे. काश्मीरमध्ये तणाव आहे. अशांत आहे. 370 कलमाचा एक पार्ट काढला. अदानीने जमिनी घेतल्या, त्यावर का बोलत नाही, असा सवालही ठाकरेंनी केला.

# " इंडिया आघाडीचं सरकार केंद्रात आलं तर.”; ममता बॅनर्जी यांची मोठी घोषणा

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

लोकसभा निवडणुकीच्या सात टप्प्यांपैकी चार टप्प्यातील मतदान प्रक्रिया पार पडली आहे. यातील पाचव्या टप्प्यातील मतदान येत्या 20 मे रोजी पार पडणार आहे. यातच काही दिवसांपूर्वी ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमध्ये इंडिया आघाडीसोबत कोणत्याही प्रकारची युती नसल्याचे सांगत ‘एकला चलो रे’ चा नारा दिला होता.

यानंतर आता तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मोठी घोषणा केली आहे. इंडिया आघाडीला केंद्रात सरकार स्थापन करण्यासाठी तृणमूल काँग्रेस बाहेरून पाठिंबा देणार असल्याची भूमिका ममता बॅनर्जी यांनी जाहीर केले आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी एका सभेला संबोधित करताना भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. त्या म्हणाल्या, “या लोकसभा निवडणुकीत जर भारतीय जनता पक्षाचा पराभव होणार असेल आणि इंडिया आघाडीचं सरकार केंद्रात स्थापन होणार असेल तर तृणमूल काँग्रेस बाहेरून पाठिंबा देण्यास तयार आहे. आम्ही केंद्रात सत्ता स्थापन केल्यास पश्चिम बंगालच्या माता भगिनींना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागणार नाही,” असे मतही यावेळी ममता बॅनर्जी यांनी व्यक्त केलं.



ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीत काँग्रेससोबतच्या जागावाटपावर असहमती दर्शवली होती. तेव्हा त्या म्हणाल्या होत्या की, ‘इंडिया आघाडीच्या स्थापनेत मी महत्त्वाची भूमिका बजावली होती. विरोधी पक्षांच्या युतीचं नावंही मीच दिलेलं होतं. पण पश्चिम बंगालमध्ये सीपीआय (एम) आणि काँग्रेस भाजपसाठी काम करत आहेत.”

दरम्यान, भारतीय जनता पार्टीच्या विरोधात देशातील विरोधी पक्षांनी एकत्र येत इंडिया आघाडी स्थापन केली. या इंडिया आघाडीच्या माध्यमातून लोकसभा निवडणुका लढवल्या जात आहेत. मात्र, पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी ‘एकला चलो’चा नारा दिलेला आहे. त्यांनी कोणत्याही पक्षांबरोबर आघाडी केली नाही. त्यामुळे ममता बॅनर्जी या इंडिया आघाडीमधून बाहेर पडल्याची चर्चा होती.